cmyk

धुलिवंदनाच्या सर्वांना... हार्दिक शुभेच्छा!
–संपादक

दैनिक

# लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....




बीड – महाराष्ट्र | वर्ष – ०३ | अंक–३४३ | सोमवार, दि.२५ मार्च २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# चार हजाराचा कांदा हजारावर आला

**पुणे । प्रतिनिधी**

**कांदा निर्यातबंदीच्या निर्णयानंतर दरात मोठी घसरण झाली आहे. ४००० ते ४५०० रुपये प्रति क्विंटलने जाणारा कांदा सध्या १००० ते १२०० रुपये प्रतिक्विंटलवर आला आहे. त्यामुळे सरकारने घेतलेल्या कांदा निर्यातबंदीचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. दरम्यान, ३१ मार्चनंतर तरी सरकार कांद्यावरील निर्यातबंदी उठवेल अशी शक्यता होती. मात्र, ही शक्यता आता मावळली आहे. सरकारने कांद्यावरील निर्यातबंदी कायम ठेवल्याने शेतकरी संतापले आहेत. ही बंदी तात्काळ उठवावी, अशी मागणी होत आहे. या बंदीचा परिणाम म्हणून ज्यांच्याशी भारताचा व्यापार आहे त्या देशांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे.**

## भारतातील कांदा निर्यातबंदीचा फटका परकीय देशांनाही



कांद्यावर निर्यातबंदी घातल्यापासून देशात कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली. शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला आहे. ८ डिसेंबर २०२३ पासून सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. ही बंदी ३१ मार्चपर्यंत राहणार असल्यो सरकारनं सांगितले होते. पण आता ही निर्यातबंदी पुढील आदेश येईपर्यंत कायम राहणार असल्याचे सरकारने सांगितले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. निर्यातबंदीचा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. दरम्यान, सरकारच्या या निर्णयाचा फटका अनेक देशांना देखील बसू शकतो. त्यांच्या बाजारपेठेत कांद्याचा दर वाढण्याची शक्यता आहे.

भारत हा कांद्याचा मोठा निर्यातदार देश आहे. देशातून मोठ्या प्रमाणावर इतर देशांमध्ये कांद्याची निर्यात केली जाते. अनेक देश कांद्याच्या बाबतीत भारतावर अवलंबून आहेत. पण सरकारने निर्यातबंदी केल्यामुळे त्या देशांमध्ये कांद्याचा तुटवडा भासत आहे. भारताकडून बांगलादेश,

◀◀ पान २ वर

## बच्चू कडू महायुतीतच, फक्त अमरावतीत स्वतंत्र लढणार



**अमरावती । प्रतिनिधी**


**प्रहार संघटनेचे नेते आणि अपक्ष आमदार बच्चू कडू यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतच राहण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. असे असले तरी अमरावतीमध्ये स्वतंत्र लढणार असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले आहे. वारंवार अपमानीत केलेल्या नवनीत राणांचा प्रचार करणार नाही, असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले आहे.**

बच्चू कडू यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे की, राणांनी आम्हांला वारंवार अपमानीत केले, त्यामुळे कार्यकर्त्यांची शरणागती पत्करण्याची मानसिकता नाही. आघाडीची उमेदवारी मागा पण, राणांचा प्रचार करायचा नाही, अशी कार्यकर्त्यांची भूमिका आहे. सातत्याने कार्यकर्त्यांनी ही भूमिका मांडली असून पक्ष सोडण्याची भावनाही व्यक्त केली आहे. त्यामुळे आम्हाला निर्णय घ्यावा लागत आहे. चांगल्या उमेदवाराच्या आम्ही शोधात होतो. आम्हांला भाजपमधीलच चांगला उमेदवार सापडला आहे.भाजपमधीलही काही कार्यकर्ते नाराज आहेत, ज्यांना मोदीजी हवे पण, राणा नको. असा कार्यकर्त्यांचा सूर आहे. यामुळे आम्ही बांधणी केली आहे. सर्वपक्षीय नाराज उमेदवारांचा फायदा आम्हाला होईल. अमरावतीमधील उमेदवारीचा निर्णय घेतला. आता ३ तारखेला अर्ज दाखल करु, असे बच्चू कडू यांनी यावेळी सांगितले.

# गोपीनाथ गड ते यशश्री; पंकजाताई मुंडेंचे जन्मभूमीत अभूतपूर्व स्वागत

## » गोपीनाथ गडावर लोकनेत्याच्या चरणी नतमस्तक





**परळी वैजनाथ। प्रतिनिधी**

**लोकसभेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पंकजाताई मुंडे यांचं आज जन्मभूमीत जल्लोषपूर्ण आणि अभूतपूर्व असं स्वागत झालं. स्वागतापूर्वी त्यांनी गोपीनाथ गडावर आपले पिता आणि नेता लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचं दर्शन घेतलं. पांगरी व परळीत कार्यकर्त्यांनी वाजतगाजत, फटाक्यांच्या आतिषबाजीत त्यांचं जोरदार स्वागत केलं.**

बीडहून दुपारी पंकजाताई मुंडे हया थेट गोपीनाथ गडावर आल्या. याठिकाणी त्यांनी लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. पालकमंत्री धनंजय मुंडे, खासदार डॉ.प्रितमताई मुंडे तसेच कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. दर्शनानंतर पांगरी येथील चौकात त्यांचं ढोल ताशांच्या निनादात वाजतगाजत, जेसीबीतून फुलांची उधळण करत जंगी स्वागत करण्यात आलं. स्वागतासाठी बाहेरून खास बॅन्ड पथक मागविण्यात आले होते.

### शहरात ठिक ठिकाणी औक्षण ; स्वागताचा जल्लोष

पंकजाताई मुंडे यांचं शहरात आगमन होताच इटके कॉर्नर, उड्डाणपूल, एकमिनार चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पदाधिकारी, कार्यकर्ते, सर्व स्तरातील नागरिक, व्यापारी, लोकप्रतिनिधी, विविध संस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले. ठिक ठिकाणी महिलांनी त्यांचं औक्षण केलं. छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास त्यांनी पुष्पहार अर्पण केला. त्यांच्या स्वागतासाठी. शहरात लावण्यात आलेल्या भव्य कट आऊट्स, बॅनर, कमानींनी लक्ष वेधून घेतले होते.

## अल्पवयीन मुलीची हत्या

**बीड । प्रतिनिधी**

अत्याचार करून अल्पवयीन मुलीची हत्या केल्याची घटना बीड तालुक्यातील घोसापुरीत घडली आहे, होळीच्या पूर्व संध्येला घडलेल्या खुनाच्या या घटनेने बीड जिल्हा हादरला आहे. अश्विनी बन्सी माळी वय १७ असे खून झालेल्या मुलीचे नाव आहे, या घटनेमध्ये पाच आरोपींचा समावेश असून अश्विनी ही आरोपीच्या मामाची मुलगी होती, या घटनेने नात्याला काळीमा फासली आहे, या प्रकरणात पाच जणांचा समावेश असून तीन जणांना बीड पोलिसांनी अटक केली आहे, आरोपींपैकी एकाने विष प्राशन केले असून त्याला उपचारार्थ बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## साक्षाळपिंप्रीत काळे झेंडे दाखवणाऱ्या तरुणांवर गुन्हा दाखल


### मनोज जरांगे आक्रमक; पंकजा मुंडे यांचे पोलिस अधिक्षकांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

**भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे या श्री क्षेत्र नगद नारायण गड येथे दर्शनासाठी जात असताना साक्षाळपिंप्री येथे काही तरुणांनी त्यांना काळे झेंडे दाखवले होते. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात पाच तरुणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याची माहिती मिळताच आंतरवली सराटी येथील बैठकीत मनोज जरांगे आक्रमक झाले. त्यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खडेबोल सुनावले. पंकजा मुंडे यांनीही पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांना पत्र देऊन संबंधित तरुणांवर गुन्हे दाखल करु नये अशी विनंती केली.**

भाजपकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पंकजा मुंडे पहिल्यांदाच शुक्रवारी बीड जिल्ह्यात आल्या. धामणगाव येथे त्यांचे जंगी स्वागत करण्यात आल्यानंतर त्यांनी शनिवारी धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायण गड संस्थान येथे येऊन नगद नारायणाचे दर्शन व आशिर्वाद घेतला. तत्पुर्वी साक्षाळपिंप्री येथे काही तरुणांनी त्या नारायणगडाकडे जात असताना त्यांना काळे झेंडे दाखवत घोषणा दिल्या होत्या. त्यानंतर त्या तरुणांवर बीड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याची माहिती मिळताच आंतरवली सराटी येथे मराठा समाजाच्या बैठकीत मनोज जरांगे चांगलेच आक्रमक झाले. त्यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खडेबोल सुनावले. पंकजा मुंडे यांच्यासाठीही अप्रत्यक्ष इशाराच होता. त्यामुळे मुंडे यांनी

◀◀ पान २ वर



पंकजा गोपीनाथ मुंडे
राष्ट्रीय सचिव, भारतीय जनता पार्टी
सह-प्रभारी, भाजपा मध्य प्रदेश

दिनांक – २४ मार्च २०२४

प्रति,
पोलिस अधीक्षक
बीड

मला अशी महिती मिळाली आहे की, माझ्या दौऱ्यात बीड तालुक्यातील साक्षाळ पिंपरी येथे दोन-तीन युवकांनी काळे रुमाल घेवून निदर्शनं केले. या युवकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आरक्षणाच्या मागणीसाठी शांतपणे निदर्शने करण्याबाबत कोणतीही हरकत असण्याचे कारण नाही. माझी याबाबत कोणतीही तक्रार नाही. ही मुलं तरुण वयाची, बहुतेक शिक्षण घेणारी किंवा नोकरीसाठी प्रयत्न करणारी असावीत, गुन्हे दाखल केल्याने त्यांच्या पुढील प्रवासामध्ये त्यांना अडचणी निर्माण होऊ शकतात. ते होऊ न देणे ही बीड जिल्ह्याचे नेतृत्व म्हणून माझी जबाबदारी आहे आणि ते परिपक्वपणाचे ठरेल असे मला वाटते. कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान होत नसेल किंवा व्यक्तीला हानी / ईजा होत नसेल, आचारसंहितेचा भंग होत नसेल, कायद्याचे उल्लंघन होत नसेल तर असे गुन्हे दाखल करण्यात येऊ नयेत ही विनंती.

धन्यवाद..!

राजेंद्र मस्के (जिल्हाध्यक्ष भाजपा, बीड)

(पंकजा गोपीनाथ मुंडे)

## डिझेल टँकरच्या धडकेने दुचाकीवरील दोघांचा मृत्यू

### बीड–नगर महामार्गावरील घटना; लिफ्ट मागने महागात पडले

**बीड । प्रतिनिधी**

**कडा येथून आपले काम आटोपून गावी निघालेल्या एका दुचाकीस्वारास दुसऱ्या एका तरुणाने हात करुन लिफ्ट मागितली. त्यानंतर दोघेही दुचाकीवर बसून धामणगाव मार्गे गावी परतत असताना डोईठाण येथील शिवनेरी परिसरात एका डिझेलच्या टँकरने त्यास जोराची धडक दिली. यात दोघांचाही मृत्यू झाल्याची घटना रविवारी दुपारी ४ वा. घडली.**



संकुडवाडी (ता. पाटोदा) येथील महादेव गायकवाड हे कडा येथील काम आटोपून गावी निघाले होते. धामणगाव येथे डोईठाण येथील एका तरुणाने त्यांच्या दुचाकीला हात करुन पुढे सोडण्याची विनंती केली. त्यानंतर दोघेही डोईठाणच्या दिशेने निघाले असता समोरुन येणाऱ्या डिझेलच्या टँकरने (क्र. एमएच १६, सीसी–७६३१) दुचाकीला जोराची धडक दिली. यात दुचाकीवरील दोघांचाही जागीच मृत्यु झाला. यातील एकाला दुचाकीची लिफ्ट चांगलीच भोवली.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२३ मार्च २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १०.५० क्विंटल | २,२०१ | २,४०१ | २,३२० |
| ज्वारी/हायब्रिड :७८.०० क्विंटल | १,६०० | ३,०९० | २,३८१ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,३०० | ९,३०० | ९,३०० |
| तूर :६.५० क्विंटल | ७,२०० | ९,५०० | ८,९०६ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: २.०० क्विंटल | २,६५० | २,८०१ | २,७१६ |
| चिंचोका/लोकल: ३.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,३५२ | ५,३५२ | ५,३५२ |

# हजारो उमेदवारापेक्षा एकच उमेदवार देणार

## लोकसभा निवडणुकीसाठी मनोज जरांगेंनी रणनीती ठरवली




**जालना । प्रतिनिधी**

**आपला आरक्षणाचा विषय हा लोकसभेत नाही. आपला विषय हा विधानसभेत आहे. आपला हा विषय राज्यपातळीवरचा आहे. मराठा आणि कुणबी एक आहेत. याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार हा राज्य सरकारला आहे. त्यामुळे आपण लोकसभेला अनेक उमेदवार उभे करण्याऐवजी एकच अपक्ष उमेदवार उभा करायचा, असे मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे– पाटील यांनी रविवारी (दि.२४) येथे स्पष्ट केले.**

मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली अंतरवाली सराटीत मराठा समाजाची निर्णायक महाबैठक पार पडली. या बैठकीला राज्यभरातून हजारो समाज बांधव उपस्थित होते. जरांगे म्हणाले की, मराठयांच्या एकीमुळे काय मिळाले, तर सव्वा कोटी बांधवांना आरक्षण मिळाले. सरकारने तालुका स्तरावर समित्या गठित केल्या, त्यावर नियंत्रण नाही. दहा टक्के आरक्षण दिले, त्यात मराठ्यांना विश्वासात घेतले नाही. गुन्हे मागे घेतले नाही, उलट गावागावात गोरगरीब समाजावर खोटे गुन्हे दाखल केले.

◀◀ पान २ वर

### हजारो उमेदवार हा किचकट पर्याय

लोकसभा निवडणुकीत हजारो उमेदवार उभे करणे हा किचकट पर्याय आहे. त्यापेक्षा एका मतदारसंघात एक उमेदवार उभे करा. समाजाच्या उमेदवारांनी अर्ज न भरता, उमेदवार कोणत्याही पक्षाचा असेल, तर त्या उमेदवारांकडून सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करणार, असे बाँडवर हमीपत्र लिहून घ्या. पण या प्रस्तावास समाज बांधवांनी नकार दिला.

### आचारसंहिता अशी पाळण्याचा निर्णय

१) कुणाच्याही सभेला जायचे नाही. २) कुणीही घर सोडायचे नाही. ३) मराठ्यांनी १०० टक्के मतदान करायचे. ४) एकच अपक्ष उमेदवार उभा करा. ५) ३० मार्च पर्यंत तुमचे गावागावांतील झालेले निर्णय कळवा.

## अखेर महादेव जानकर महायुतीत सहभागी

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. गेले अनेक दिवस राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाला पाठिंबा देणार अशा चर्चा होत्या. मात्र रविवारी याबाबतची एक मोठी अपडेट समोर आली आहे. जानकर यांनी महायुतीत सहभागी झाले असल्याचे वृत्त समोर आले आहे. महादेव जानकर यांच्या पक्षाला लोकसभेची एक जागा दिली जाण्याची शक्यता देखील वर्तविण्यात येत आहे.

लोकसभा निवडणूकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही पक्षांतील राजकीय हालचालींना वेग आला आहे. रासपचे नेते महादेव जानकर यांनी महायुतीत सहभागी होण्याचा निर्णय जाहीर केला. ते माढा आणि परभणी येथून स्वबळावर निवडणूक

◀◀ पान २ वर

### सुटीची सुचना

**आज सोमवार, दि.२५ मार्च २०२४ रोजी धुलिवंदननिमित्त दै. राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या मंगळवार, दि.२६ मार्च २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.**

**–व्यवस्थापक**

cmyk

## अग्रलेख

# सदृढ लोकशाहीसाठी पक्षीय आचारसंहिता महत्वाची

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताचा उल्लेख केला जातो. नागरिकांना वेळोवेळी त्यांचे प्रतिनिधी निवडण्याची संधी मिळेल याची खात्री करून राष्ट्रीय आणि राज्य अशा दोन्ही स्तरांवर निवडणुका घेतल्या जातात. लोकसभेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात आणि राज्य विधानसभेच्या निवडणुका कमीत कमी दर पाच वर्षांनी होतात. या व्यतिरिक्त, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे लोकशाही जिवंतपणा आणखी वाढतो, ज्यामुळे नागरिकांना तळागाळातील प्रशासनात सहभागी होता येते. देशात स्वतंत्र आणि निष्पक्षपातीपणे निवडणुका व्हाव्यात यासाठी निवडणूक आयोगाने काही नियम घातले आहेत. याच नियमांना आचारसंहिता असे म्हटले जाते.

निवडणुका जाहीर झाल्यानंतर निवडणुकीत सहभागी होणाऱ्या सगळ्या पक्षांनी आणि उमेदवारांनी ही आचारसंहिता पाळणे अनिवार्य असते; परंतु गेल्या काही वर्षांत निवडणूक आयोगाला संशयाच्या नजरेने पाहण्याचा, त्याची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न तथाकथित सिव्हिल सोसायटी आणि विरोधकांनी सुरू केला आहे. ईव्हीएम मशीनवर एका राज्यात निवडणुका जिंकणाऱ्या राजकीय पक्षांनी दुसऱ्या राज्यात पराभव झाल्याचे खापर ईव्हीएम फोडण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यातून केंद्रीय निवडणूक आयोगाला आरोपींच्या पिंजऱ्यात उभा करण्याचा प्रयत्न झाला आहे. ईव्हीएमवर आक्षेप घेणाऱ्या २० हून अधिक याचिका न्यायालयाने फेटाळल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १६ मार्च रोजी आचारसंहिता लागू केल्यानंतर विकास भारत संकल्प यात्रेचा व्हॉट्सअॅप मेसेज देशवासीयांपर्यंत पोहोचला, अशी तक्रार टिएमसीचे नेते डेरेक ओब्रायन यांनी १८ मार्च रोजी निवडणूक आयोगाला केली होती. पंतप्रधानांनी पाठवलेल्या संदेशामुळे भाजपाचा प्रचार झाला आहे, असा दावा करण्यात आला होता. या तक्रारीची दखल घेत निवडणूक आयोगाने गुरुवारी केंद्र सरकारच्या तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला व्हॉट्सअॅपवर पाठवले जाणारे विकास भारत संदेश त्वरित थांबवण्याचे निर्देश दिले. यापूर्वी निवडणुका पारदर्शी व्हाव्यात यासाठी एकाच ठिकाणी अनेक वर्षे ठाण मांडून बसलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

गुजरात, पंजाब, ओडिशा आणि आसाम या चार राज्यांमध्ये नॉन-कॅडर अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून यामध्ये ८ जिल्हाधिकारी आणि ८ एसपींचा समावेश आहे. आसाममध्ये भाजपाचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांचे भाऊ सोनितपूरचे एसपी सुशांत बिस्वा सरमा आणि पंजाबमध्ये खादूर साहिबमधील काँग्रेस खासदार जसबीर सिंग गिल यांचे भाऊ भटिंडा हर्ननबीर सिंग गिल यांना हटवण्यात आले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इक्बाल सिंग चहल, पश्चिम बंगालचे डीजीपी आणि ६ राज्यांच्या गृह सचिवांना हटवले आहे. सत्ताधारी पक्षासह सर्व राजकीय पक्ष आणि निवडणूक रिंगणातील उमेदवारांना निवडणूक आचारसंहिता लागू होते. सत्ताधारी पक्षांवर अधिक जबाबदारी असते. या काळात कुठल्याही प्रकारे सरकारी घोषणा, नवीन योजना सुरू करता येत नाही. शिलान्यास, उद्घाटन, लोकार्पण, भूमिपूजन असे कार्यक्रमही घेता येत नाहीत. एवढेच नव्हे तर सरकारी गाडी, सरकारी बंगला किंवा सरकारी विमानाचा वापर निवडणूक प्रचारासाठी करण्यास मनाई आहे. तसेच कुठल्याही पक्षाला प्रचारसभा, रॅली किंवा मिरवणूक काढायची असेल, तर पोलिसांची पूर्वपरवानगी गरजेची असते. कुठलाही राजकीय पक्ष किंवा उमेदवार धर्म, जाती, पंथ या आधारे मतदारांना मत देण्याचे आवाहन करू शकत नाही. जातीधर्मावरून तणाव निर्माण होईल अशी कुठलीही कृती प्रचारादरम्यान करण्यास मनाई आहे. त्यामुळे आचारसंहिता पाळण्याची जबाबदारी राजकीय पक्षांच्या खांद्यावर आहे. भारताची लोकशाहीप्रती असलेली बांधिलकी ही एक दिवा आहे, जो वसाहतवादापासून सार्वभौम राष्ट्रत्वापर्यंतचा प्रवास दाखवतो. गजबजलेल्या महानगरांपासून ते अतिदुर्गम खेड्यांपर्यंत, प्रत्येक नागरिकाचा आवाज लोकशाही कॉरिडॉरमध्ये प्रतिध्वनी शोधतो आणि विचार, विश्वास आणि अभिव्यक्तीमध्ये विविधता निर्माण करतो, हे भारताचे वैशिष्ट्य आहे. भारतातील लोकशाही आचारसंहिता केवळ शासनाच्या पलीकडे असून हा एक विविधतेतील एकतेचा उत्सव आहे. संस्कृती, भाषा आणि समृद्ध परंपरेसह, राष्ट्राला त्याच्या बहुलवादी ओळखीमध्ये सामर्थ्य मिळते. सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिक भेदांची पर्वा न करता प्रतिनिधित्व आणि समावेशाची बांधिलकी हा भारताच्या लोकशाही प्रवासाचा पाया आहे. त्यामुळे यंदाच्या लोकसभा निवडणुकीत त्याचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी राजकीय पक्षांवर आहे.

## दहिफळ वडमाऊली येथे दरोड्याचा प्रयत्न फसला !

केज । प्रतिनिधी

**भाजपचे नेते आणि काळेगाव घाट येथील महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. राहुल गदळे यांच्या दहिफळ वडमाऊली येथील घरावर अज्ञात सात ते आठ लोकांनी दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या घरा असलेल्या शेजाऱ्यांमुळे त्यांचा प्रयत्न फसला.**

केज तालुक्यातील भाजपचे नेते आणि काळेगाव घाट येथील महाविद्यालयाचे प्राचार्य राहुल गदळे यांचे वडील सखाहरी गदळे हे दहिफळ वडमाऊली येथील राहत आहेत.राहत्या घरी दि. २३ मार्च रोजी मध्यरात्री घरा समोर विना नंबरच्या दोन पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कार मधून सात ते आठ अनोळखी दरोडेखोर आले. त्यातील एकाने त्यांच्या घरा समोर लावलेला सीसीटीव्ही कॅमेरा फोडून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी त्यांच्या घराशेजारी असलेल्या शेजाऱ्यांना चाहूल लागल्याने दरोडेखोर घरात प्रवेश न करता पळून गेले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. दरम्यान त्या चोरट्या पैकी दोघांच्या अंगावर खाकी रंगाचे कपडे असल्याची चर्चा आहे. प्राचार्य प्रा. राहुल गदळे यांच्या तक्रारी वरून दि. २४ मार्च रोजी केज पोलिस ठाण्यात सात ते आठ अज्ञात चोरट्या विरुद्ध गु. र. नं. १४४/२०२४ भा. दं. वि. १४७, १४८, १४९ आणि ४५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक बाळराजे सोनवणे हे पुढील तपास करीत आहेत.

# केंद्र शासनाने इथेनॉल धोरणाचा पुर्नविचार करावा-आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

**केवळ साखर उत्पादनावर शेतकऱ्यांना एफ.आर.पी प्रमाणे भाव देणे कारखानदारांना शक्य होत नसल्याने केंद्र शासनाने इथेनॉल निमीतीला घातलेल्या बंदी निर्णयाचा फेर विचार करुन हि बंदी मागे घ्यावी अशी अपेक्षा व मागणी साखर संघाचे उपाध्यक्ष तथा लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक आ. प्रकाश सोळंके यांनी कारखान्याच्या ३२ व्या उस गाळप हंगाम सांगता समारंभ प्रसंगी बोलताना केली.**

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन २०२३-२४ च्या ३२ व्या उस गाळप हंगामाचा सांगता समारंभ दि.२३ मार्च रोजी झाला. यावेळी कारखान्याचे मार्गदर्शक तथा साखर संघाचे उपाध्यक्ष आ. प्रकाश सोळंके यांच्या शुभहस्ते विधीवत गव्हाण पुजन करून या उस गळीत हंगामाची सांगता करण्यात आला. याप्रसंगी उस वाहतूक करणाऱ्या बैलगाडी चालक, ट्रक. मिनी ट्रॅक्टर चालक यांच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ. सोळंके म्हणाले की. केवळ साखरेचे उत्पादन करुन शेतकऱ्यांना एफ.आर.पी. प्रमाणे भाव देणे शक्य नाही. त्यामूळे कारखानदारांनी कारखान्याच्या माध्यमातून उपपदार्थ निर्मातीचे प्रकल्प उभे केले उदा. इथेनॉल निर्माती. को. जनरेशन आदि उपपदार्थ निमीतर्ती प्रकल्प कार्यान्वीत करून त्यातून मिळणाऱ्या रक्कमेतून



शेतकऱ्यांना जास्तीचा भाव देण्याचा प्रयत्न केला जात होता मात्र यामूळे साखरेचे उत्पादन कमी होत असल्याचे केंद्र शासनाच्या निदर्शनास आल्याने केंद्र शासनाने दि.७ डिसेंबर २०२३ पासुन सर्वच साखर कारखान्यातील इथेनॉल निर्मातीस बंदी घातली. त्यामूळे कुठल्याच साखर कारखान्यात इथेनॉल निर्मीती होत नाही. पुर्वी आपल्या कारखान्याची ४५ हजार लिटर इथेनॉल निर्मीतीचा प्रकल्प होता मात्र गेल्या वर्षी जवळपास १०० कोटी खर्च करून इथेनॉल विस्तारीकरण करून १ लाख लिटर क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वीत केला आणि इथेनॉल बंदीचा निर्णय आला त्यामूळे आपल्या कारखान्याचे खुप मोठे नुकसान झालेले असून, आता कमाल एफ.आर.पी. प्रमाणे भाव देणे शक्य होत नसल्याने केंद्र शासनाने इथेनॉल बंदीचा घेतलेला निर्णयाचा फेरविचार करून इथेनॉल निर्मातीस परवानगी द्यावी अशी अपेक्षा वजा मागणी आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केली. पुढे म्हणाले की, मागच्या वर्षीचे १५० रुपये देणे बाकी असून ते ऊस उत्पादक यांना लवकरच देण्यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. सन २०२३-२४ या गाळप हंगामामध्ये एकुण १६८ दिवसामध्ये ६.४५ लाख मे. टन उसाचे गाळप करून सरासरी १०.२९% साखर उताऱ्याने ४.९७ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केलेले असून या बरोबरच १.७० कोटी लिटर्स इथेनॉलचे उत्पादन घेवून ३.५८.७१.६०० युनिट विज राज्य विज वितरण कंपनीस निर्यात केली आहे. कार्यक्रमास कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, बिगर सभासद, उस उत्पादक शेतकरी, कार्यकारी संचालक श्री. आर. सी. बडगुजर व सर्व खाते उपखातेप्रमुख, कर्मचारी आणि कामगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार संचालक श्री. छगनराव जाधव यांनी केले.

## अरविंद केजरीवाल आणि काँग्रेसच्या समर्थनार्थ दिल्लीत इंडिया आघाडीची रॅली

नवी दिल्ली । वृतसंस्था

**इंडिया आघाडीचे सदस्य असलेल्या आम आदमी पार्टीचे संयोजक अरविंद केजरीवाल यांना दिल्ली लिकर पॉलिसीप्रकरणी ईडीने अटक केली. तसेच आम आदमी पार्टीचे दिल्लीतील पक्ष कार्यालयही सील केले. निवडणूकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षाची बँक खाती सील करण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील रामलीला मैदानावर या दोन्ही घटनांच्या विरोधात आणि केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात इंडिया आघाडीच्यावतीने महारॅली आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. ही महारॅली ३१ मार्च रोजी होणार असल्याचेही यावेळी जाहिर करण्यात आले.**

एकाबाजूला लोकसभा निवडणूकांची घोषणा करण्यात आल्यानंतर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. तर दुसऱ्याबाजूला काँग्रेस पक्षाची लोकसभा निवडणूकीच्या तोंडावर बँक खाती आयकर विभागाने सील केली आहेत. त्यामुळे निवडणूकीच्या रिंगणातून विरोधकांना बाजूला सारण्याचा प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारकडून करण्यात येत आहे. त्यातच केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आचारसंहिता लागू केलेली असल्याने राजकीय विरोधकांना केंद्र सरकारच्या विविध यंत्रणाकडून करण्यात येत असलेल्या कारवाईला कायदेशीर उत्तर द्यायचे की पक्षाचे उमेदवार जाहिर करून निवडणूकीच्या माध्यमातून लढत द्यायची असा पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधातील लढाई अधिक तीव्र करण्यासाठी रामलीला मैदानावर महारॅलीचे आयोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, दिल्लीसह देशभरातील अनेक राज्यामध्ये अरविंद केजरीवाल यांना ईडीने केलेल्या कारवाईच्या विरोधात आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी आंदोलने सुरुच ठेवली आहेत. तर दिल्ली पोलिसांकडून आम आदमी पार्टीच्या आमदार आणि खासदारांच्या हिंडण्याफिरण्यावर बंधने घालण्यात येत आहेत.

# यंदा कोणत्या जावयाची होणार गदर्भ स्वारी

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील विडा येथे धुलीवंदनाच्या दिवशी जावयाला गाढवावर बसवण्याची एक आगळीवेगळी परंपरा गेल्या शंभर वर्षांपासून विडेकर साजरी करतात परंतु मागील काही दिवसापासून विड्याचे जावई घर सोडून फरार झाले आहेत तर काहींनी आपले मोबाइल फोन बंद ठेवले आहेत विड्यात शंभर पेक्षा जास्त जावई आहेत यातील कोणाचा गदर्भ सवारीसाठी नंबर लागतो याची उत्सुकता सर्वांना लागली आहे जावई शोध घेण्यासाठी सर्वात जास्त प्रमाणात कसरत करावी लागते करण विड्याचे जावई म्हणलं की त्यांना आपली स्वतः चे गाव सोडून बाहेर गावी काही दिवसासाठी जावा लागते करण कधी विड्याचे मेव्हणे येतील आणि आम्हला पकडून

## विड्यातील गावकऱ्यांचा जावाई शोध सुरु

नेतील या भीतीने या भीतीने आपअपली गावे सोडून पसार होतात ही परंपरा गेल्या संभार वर्षा पासून असून आतापर्यंत ९० पेक्षा जास्त जावई गाढवावरून मिरवले आहेत,ही परंपरा तत्कालीन ठाकूर आनंदराव देशमुख यांचे लातूर चे जावई यांना प्रथम थट्टा मस्करीने धुलीवंदनाच्या दिवशी गाढवावर बसून मिरवण्यात आले होते तेंव्हा पासून ही परंपरा अखंडपणे चालू आहे जावईला शोधून आणल्यावर त्याला एक दिवस अगोदर ग्रामपंचायत मध्ये सर्वांच्या नजर कैद मध्ये ठवले जाते व धुलीवंदनाच्या दिवशी सकाळी ९ च्या सुमारास गाढव आणून गाढवाच्या गळ्यात चप्पल व बुटाचे हार घालून जावयाला त्यावर बसवून ढोल ताशे व डॉल्बीच्या तालावर गावभर मिरवणूक काढली जाते, ही मिरवणूक गावभर मिरवल्यास मिरवणुकिचा शेवट मारुती मंदिराच्या पारावर विसर्जित केली जाते मग होतो इथे जावयाचा मान पण पारावर सरपंच व गावकऱ्यांच्या हस्ते नवीन कपडे व सासरा काढून एक सोन्याची अंगठी घातले जाते या मिरवणुकीत कुठल्याही भेदभाव न करता सर्वांना एकत्रित घेऊन कार्यक्रम पार पडला जातो, जावई आणण्यासाठी लढवावी लागते नामी शक्कल गेल्यावर्षी केज तालुक्यातील जवळबन युराज पटाईत याना मध्यरात्री १ च्या सुमारास सांगण्यात आले की काका उठा बाहेर खूप मोठा साप निघाला आहे पटकन बाहेर या असे खोटे बोलून त्यांना गाढव धिंडीचा मानकरी बनवलं होतं व अशा प्रकारे नामी शक्कल लढवावी लागते,हा कार्यक्रम सोमवारी २५ मार्च रोजी सकाळी होणार असून हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी सरपंच सुरज पटाईत उपसरपंच सदाशिव वाघमारे, गोविंद देशमुख राजेभाऊ घोरपडे, महादेव पटाईत शहाजी घुटे, नारायण वाघमारे इत्यादीसह ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. हा जावई मिरवणुकीचा कार्यक्रम सोमवारी २५ मार्च रोजी होणार असून जावई शोधण्यासाठी दोन ते तीन टीम तयार केल्या आहेत त्या टीम जावई शोधण्यासाठी आपल्या कामाला लागल्या असून विडेकराना जावई शोधण्यासाठी मोठे आव्हान आहे .

## पान १ वरून...

### चार हजाराचा कांदा

नेपाळ, मलेशिया हे देश मोठ्या प्रमाणात कांद्याची खरेदी करतात. पण भारताना कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळं या देशांमध्ये कांद्याचे दर वाढण्याची शक्यचता निर्माण झाली आहे.

-----------

### अखेर महादेव जानकर

लढविण्याचा निर्णय जाहीर करतील का याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. मात्र त्यांनी जाहीर केलेल्या निर्णयानंतर आता ते महायुतीसोबत राहतील हे स्पष्ट झाले आहे. महायुतीकडे त्यांनी तीन जागा मागितल्याच्या चर्चा होत्या. मात्र एक जागा निश्चिच होण्याची शक्यता असल्याचे सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.

---------

### हजारो उमेदवारांपेक्षा एकच

फुले उधळले म्हणून जेसीबी चालकांवर गुन्हे दाखल केले. बँड वाजवणारे यांच्यावर गुन्हे दाखल केले. ट्रॅक्टर चालकांवर गुन्हे दाखल केले, साखळी उपोषणकर्त्यांवर गुन्हे दाखल केले. हे पाप कुठे फेडणार, अशा शब्दांत जरांगे यांनी गृहमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यावर निशाणा साधला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर समाजाने खूप प्रेम केले. पण शिंदे साहेब तुम्हीही आमच्या विरोधात गरळ ओकली. आचारसंहितेच्या पूर्वी आरक्षण लागू करू, कॅबिनेट बैठकीत निर्णय घेवू म्हणत होते, पण आरक्षण मिळाले नाही. आतापर्यंत आरक्षण न देऊन आपल्याला ज्यांनी उन्हात आणले, त्यांना उन्हात आणायची वेळ आता आली आहे. आपल्या शक्तीचा वापर करावा लागेल. फडणवीस सांगतात की, १० टक्के आरक्षण मिळाल्याने मराठा समाज खूश आहे. पण हे खोटे आहे. हे आरक्षण आम्हाला मान्य नाही. ते आम्ही मागितले नाही. द्यायचेच असेल, तर ते ५० टक्क्याच्या आत द्या, असे जरांगे म्हणाले. कोणताही लढा लढायला मी समाजासोबत आहे. समाज माझा मालक आहे. समाजाने जो उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला, तो समाजाचा निर्णय आहे. आपल्यासोबत दलित व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने आहेत, असेही ते म्हणाले.

-----------

### साक्षाळपिंप्रीत काळे झेंडे

तातडीने पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांना पत्र लिहून आंदोलकांवर असे गुन्हे दाखल करु नये अशी विनंती केली. तसे पत्र भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, प्रा. देविदास नागरगोजे, चंद्रकांत फड यांनी पंकजा मुंडे यांच्यावतीने पत्र दिले. मुंडे यांच्या या भुमिकेचे जिल्हाभरातून मराठा समाजाने कौतूक केले आहे.

# भाजपचे पुन्हा धक्कातंत्र, १११ उमेदवारांची यादी जाहिर

## पाचव्या यादीत राम सातपुतेंना सोलापूरमधून उमेदवारी

नवी दिल्ली । वृतसंस्था

भाजपने पाचवी यादी जाहीर केली असून महाराष्ट्रातील युवा नेते राम सातपुते यांना सोलापूरमधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर सुनील मेंढे यांना भंडारा गोंदिया लोकसभेच्या जागेसाठी उमेदवारी जाहीर झाली आहे. तर अशोक महादेवराव नेते यांना गडचिरोली-चिमूर मधून तिकीट देण्यात आलंय. एकीकडे माढाच्या जागेवरून वाद सुरू असताना भाजपने सोलापूरात सावध खेळी केल्याचं पहायला मिळतंय. सोलापूरच्या जागेवर राम सातपुते या युवा तरुण आमदाराला तिकीट दिल्याने आता सोलापुरात प्रणिती शिंदे विरुद्ध राम सातपुते यांच्यात लढत पहायला मिळेल. भाजपच्या पाचव्या यादीत बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौतला लोकसभेसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. कंगना मंडीमधून निवडणूक लढवेल. तर बेगुसरायमधून गिरिराज सिंग यांची उमेदवारी निश्चित झालीये. तसेच पटना साहिबमधून रवी शंकर प्रसाद लढतील. त्याचबरोबर सुल्तानपूरमधून मेनका गांधी यांना तिकीट देण्यात आलं आहे. भाजपने पाचव्या यादीत एकूण १११ उमेदवारांची नावं निश्चित केली.

## राज्यात उष्णतेची लाट?

पुणे । प्रतिनिधी

मार्च महिन्यातच तापमानाचा पारा चढला आहे. महाराष्ट्रातील काही भागांत तर पारा ४० अंशावर पोहोचला आहे. मार्च महिन्यातच तापमान वाढल्याने एप्रिल-मेमध्ये काय होईल या विचारानेच नागरिकांना घाम फुटला आहे. राज्यांमध्ये उष्माघाताची लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे आरोग्य विभागाकडून उष्माघात कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच, नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नाशिकच्या मालेगावमध्ये शनिवारी तापमानाने चाळीशी पार केली होती. मालेगावमध्ये ४०.६ अंश इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद करण्यात आली होती. वाढत्या तापमानामुळे अनेक जण दुपारी घराबाहेर जाणेही टाळत आहेत. तर, नाशिक शहराचे तापमान ३६.९ अंश तर किमान तापमान ८.६ अंश नोंदवले गेले आहे. मात्र, जिल्ह्यातील मालेगावमध्ये मात्र आत्तापासूनच तापमानाने चाळीशी ओलांडली आहे. मार्च महिन्यातच राज्यातील अनेक जिल्ह्यांत तापमान ३३ ते ३५ अंशांवर पोहोचल्याने उष्णतेची लाट जाणवू लागली आहे. यातच यंदा दुष्काळाचे सावट असल्याने प्रामुख्याने मालेगाव, येवला व नांदगाव या तालुक्यांमध्ये उष्माघाताची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. उन्हाचा पार वाढत असल्याने उष्माघात होऊ नये यासाठी आरोग्य विभाग सरसावला असून जिल्ह्यातील विविध आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष कार्यान्वित केले आहेत. नागरिकांनी उन्हात जाण्याचे टाळावे, उष्माघाताची लक्षणे दिसत असल्यास आरोग्य विभागाशी संपर्क करा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. ऊन खूप वाढल्यानंतर डोकं दुखणे, चक्कर येणे, उलट्या होणे, अस्वस्छ वाटणे, निराश वाटणे ही सर्व उष्माघाताची लक्षणे आहेत. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी आत्तापासूनच सतर्क राहण्याची गरज आहे. १२ ते ३ या दरम्यान उन्हाची तीव्रता जास्त असते. त्यामुळे या काळात घराबाहेर पडणे टाळावे. जर घराबाहेर पडायचे असेलच तर छत्री घेऊन किंवा टोपी घालूनच घराबाहेर पडावे. तसेच, सनस्क्रीन अगदी न विसरता लावा. पाणी भरपूर प्या तसेच, कलिंगड, नारळपाणी अशी नैसर्गिक शीतपेये प्या. सौम्य रंगाचे व कॉटनचे कपडे वापरा. यामुळे ऊन खूप कमी लागते. वृद्ध व लहान मुलांना यावेळी बाहेर पाठवू नका उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास पाणी भरपूर प्या. गरमीच्या वातावरणातून थोडं दूर जा. एका ठिकाणी शांत बसून राहा किंवा झोपून राहा. किंवा अगदीच जास्त त्रास जाणवत असेल तर लगेचच रुग्णालय गाठा, असे डॉक्टरांनी म्हटले आहे.

दिनांक: २३-०३-२०२४

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस, वित्त संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सविता राधेशाम सौंदर, रा. पुंगणी, ता. माजलगाव, जि. बीड हे आहेत.

सदर मिळकत ही पुर्वीचे मालक आसाराम पंडितराव शिंदे वगैरे यांनी उज्वला अनिलकुमार मुनोत यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७ दिनांक १०-०७-२००७ अन्वये विक्री केलेली आहे. त्यानंतर सदर मिळकत उज्वला अनिलकुमार मुनीत यांनी मोतीलाल रायचंद संचेती यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. १५७१/२००९ दिनांक १३-०५-२००९ नुसार विक्री केलेली आहे. त्यानंतर सदर मिळकत मोतीलाल रायचंद संचेती यांनी उद्धव ज्ञानोबा अहिरे यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. ५९५३/२०१४ दिनांक २७-१०-२०२४ नुसार विक्री केलेली आहे.

त्यानंतर सदर मिळकत ही सविता राधेशाम सौंदर यांनी खरेदी केलेली आहे व ते सध्या सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत.

तथापी, वर नमूद नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७, नोंदणीकृत क्र. १५७१/२००९ व नोंदणीकृत खरेदीखत क्र.५९५३/२०१४ या तिन्ही खरेदीखताच्या मुळ प्रती व नोंदणी पावत्या सविता राधेशाम सौंदर यांचेकडून गहाळ झालेल्या आहेत.

सदर मिळकती बाबत नोंदविलेले मुळ नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७. नोंदणीकृत क्र. १५७१/२००९ व नोंदणीकृत खरेदीखत क्र. ५९५३/२०१४ व त्या सोबत असलेली मुळ नोंदणी पावती ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील मा. दुव्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील नगर परिषद मालमत्ता क्र. १-४-३४१२ (प्लॉट नं.१२०), सर्व्हे नं. ५५ तरफ गिराम, भक्ती कन्स्ट्रक्शन, बीड, ता.जि.बीड, ज्याची चतुः सिमाः-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस प्लॉट | : | नं. १०३ |
| पश्चिमेस: | : | २० फुट रूंदीचा रस्ता |
| दक्षिणेस | : | प्लॉट नं. ११९ |
| उत्तरेस | : | वारभुवन यांचा प्लॉट नं. १२० पैकी |

सदर मिळकतीचे विद्यमान मालक :
सविता राधेशाम सौंदर
रा. पुंगणी, ता. माजलगाव, जि.बीड

**जाहीर नोटीस देणार**
**सविता राधेशाम सौंदर**
**मो.नं. ८८३३४३४४४० :**

**मार्फत**
**एस.आर.राजपुत, बीड**

दिनांक: २३-०३-२०२४

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस, वित्त संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रभाकर सोनाजी जाधव, रा. पिंपरगव्हाण रोड, बीड, ता. जि. बीड हे आहेत.

सदर मिळकत ही पुर्वीचे मालक आसाराम पंडितराव शिंदे वगैरे यांनी उज्वला अनिलकुमार मुनोत यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७ दिनांक १०-०७-२००७ अन्वये विक्री केलेली आहे. त्यानंतर सदर मिळकत उज्वला अनिलकुमार मुनोत यांनी सौ. प्रिती आनंद बोरा व इतर यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. ८८४/२००९ दिनांक २५-०३-२००९ नुसार विक्री केलेली आहे, त्यानंतर सदर मिळकत ही प्रभाकरराव सोनाजी जाधव यांनी खरेदी केलेली आहे व ते सध्या सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. तथापी, वर नमूद नोंदणीकृत खरेदीखत क्र.३१०५/२००७ आणि नोंदणीकृत क्र.८८४/२००९ या दोन्ही खरेदीखताच्या मुळ प्रती व नोंदणी पावत्या प्रभाकर सोनाजीराव जाधव यांचेकडून गहाळ झालेल्या आहेत.

सदर मिळकती बाबत नोंदविलेले मुळ नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७ आणि नोंदणीकृत क्र.८८४/२००९ व त्या सोबत असलेली मुळ नोंदणी पावती ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील नगर परिषद मालमत्ता क्र.१-४-४१९९ (प्लॉट नं. १२४), सर्व्हे नं.५५ तरफ गिराम, भक्ती कन्स्ट्रक्शन, बीड, ता.जि.बीड, ज्याची चतुः सिमाः-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | प्लॉट नं. ९९ |
| पश्चिमेस | : | २० फुट रूंदीचा रस्ता |
| दक्षिणेस | : | प्लॉट नं. १२३ |
| उत्तरेस | : | प्लॉट नं. ९८ |

सदर मिळकतीचे विद्यमान मालक :
प्रभाकर सोनाजी जाधव
रा.पिंपरगव्हाण रोड, बीड

**जाहीर नोटीस देणार**
**प्रभाकर सोनाजी जाधव**
**मो.नं.८८३३४३४४४०**
**८६००१६४७५७**

**मार्फत**
**एस.आर.राजपुत, बीड**

cmyk

# होलिकेच्या पवित्र अग्नीत दु:ख, दारिद्र्य आणि अहंकाराचे दहन व्हावे व सर्वांच्या आयुष्यात सुख-समृद्धी नांदावी-धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ : होलिकेच्या पवित्र अग्नीमध्ये दु:ख, दारिद्र्य आणि अहंकाराचे दहन होऊन सर्वांच्या आयुष्यात सुख समृद्धी नांदावी अशा शब्दात राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी होळी व धुलीवंदनाच्या बीड जिल्हा वासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

होळीच्या अग्निमध्ये वाईट प्रवृत्तीचे दहन करून धुलीवंदनाच्या दिवशी रंगांचा उत्सव साजरा करण्याची होळीची परंपरा आहे; यानिमित्त जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा वासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, यावर्षी बीड जिल्ह्यासह मराठवाड्यावर नैसर्गिक जलसंकट आहे. त्यामुळे धुलीवंदन-रंगपंचमी साजरी करताना पाण्याचा अपव्यय टाळावा तसेच कोणतीही शारीरिक हानी किंवा इजा करणारे रंग टाळून नैसर्गिक रंगांचा वापर करून होळी-धुलीवंदनाचे हे पर्व आनंदात साजरे करावे, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा वासीयांना केले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २५ मार्च २०२४


# ''बकुळफुले'' वाचकांच्या मनाचा ठाव घेणारं पुस्तक ठरेल-अमर हबीब यांचे मत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

''बकुळफुले'' वाचकांच्या मनाचा ठाव घेणारं पुस्तक ठरेल असे मत ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक अमर हबीब यांनी व्यक्त केले.

येथील ज्येष्ठ नागरिक व उत्तम वाचक तुळशीदास पल्लेवार यांनी लिहिलेल्या ''बकुळफुले'' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात अमर हबीब बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार होते.




आपल्या विस्तारीत मनोगतात अमर हबीब पुढे म्हणाले की, ''बकुळफुले'' या पुस्तकात शब्दबद्ध करण्यात आलेली सर्व पात्रे ही लेखकाच्या नातेसंबंधातील असले तरी ते सर्व या अंबाजोगाई शहरातील प्रातिनिधिक पात्रे आहेत, त्यामुळे ''बकुळफुले'' हे ठराविक कुटुंबापुरते मर्यादित नाही तर ती सर्वांचेच प्रातिनिधिक स्वरूपातील आहेत असे मत व्यक्त केले.

''बकुळफुले'' लिहितांना लेखकाने आपले लिखाण कौशल्य पणाला लावले असून हळव्या आणि दुख-या घटनांची मांडणी अत्यंत कमी शब्दात मार्मिकपणे केली आहे. आपल्या कुटुंबातील आणि सहवासातील व्यक्ती बद्दल लिहितांना लेखकाने हातचे काही राखून ठेवले नाही किंवा उगीच पाल्हाळपणे ते पात्र रंगविण्याचा अथवा थांबवण्याचा ही प्रयत्न केला नाही. लालित्यपूर्ण भाषेत लिहिलेले ''बकुळफुले'' हे वाचकांच्या मनाचा ठाव घेणारे पुस्तक ठरेल असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रारंभी लेखक तुळशीदास पल्लेवार यांनी आपल्या मनोगतात ''बकुळफुले'' लिहिण्यामागील आपली प्रेरणा व कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या सहकार्याबद्दलची माहिती दिली. मुर्त स्वरुपात असणाऱ्या या पुस्तकाला पुर्णत्वाच्या स्वरुपात आणण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे त्यांनी आभार मानले.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी पुस्तक शब्दबध्द केलेल्या अनेक बकुळ फुलांच्या आठवणीं अधोरेखित केल्या. ''बकुळफुले'' ही केवळ स्मरणिका नाही तर ती या परिवाराची डॉक्युमेंटरी झाली आहे. परिवारातील ज्यि सदस्यांनी ही ''बकुळ फुले'' पाहिलेली आहेत, अनुभवलेली आहेत, एवढेच नव्हे तर या बकुळ फुलांच्या सुवास ही घेतला आहे त्यांना आणि ज्यांनी ही ''बकुळफुले'' पाहिलेली नाहीत त्यांच्या साठी ही डॉक्युमेंटरी निश्चित उपयोगी पडेल असे म्हटले आहे. साहित्य क्षेत्रात असा नवा अफलातून प्रयोग करणा-या लेखकास या बुकुळफुले च्या प्रकाशन निमित्ताने खुप खुप शुभेच्छा त्यांनी दिल्या. येथील हॉटेल साई पॅलेस घ्या फंक्शन हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या टुमदार कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ नागरिक महिला मंचच्या इंदु पल्लेवार यांनी केले. तर या कार्यक्रमात दिपक श्रीरामवार, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी काशिनाथ रापतवार, कमलाकर पल्लेवार, कल्पना पल्लेवार, खुषी पल्लेवार, राजेंद्र रापतवार, विवेक पल्लेवार, व इतरांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुनम पल्लेवार यांनी केले तर आभार पुजा पल्लेवार यांनी मानले.

# वडवणीत बालक व नागरीकांमध्ये गालफुगी आजाराची साथ

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहर व परिसरात मागील काही दिवसांपासून संसर्गजन्य आजाराच्या साथी पसरण्यास सुरुवात झाली असुन सध्या एक ते पंधरा वर्षे वयोगटातील बालकांमध्ये व नागरीकांमध्ये गालफुगी अर्थात गलगंड या आजाराचे प्रमाण वाढले आहे. लाळ ग्रंथीवर सूज येऊन हा आजार होत असल्यामुळे बालकांना व नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या आजारावर वेळेत व तातडीने उपचार घेण्याची गरज असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. स्वच्छतेच्या अभावामुळे वडवणी शहर व परिसरात मागील काही दिवसात बदलत्या वातावरणात संसर्गजन्य आजार पसरत आहेत. डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. डेंग्यूचे व गोचीड तापाचे देखील काही रुग्ण आढळण्यास आता सुरुवात झाली आहे. त्यातच मागील काही दिवसात शालेय विद्यार्थी व बालकांमध्ये एक ते पंधरा



वर्षे वयोगटात गालफुगी या आजाराचे रुग्ण दररोज वाढताना आढळत आहेत. हा आजार संसर्गजन्य असून शाळेत बालक सातत्याने एकमेकांच्या जवळ व संपर्कात असल्याने हा आजार मोठ्या प्रमाणात पसरला आहे. मम्पस हे एक व्हायरल संक्रमण आहे. ज्यामुळे लाळ ग्रंथि सुजतात, हे सामान्यत: बालवयाच्या दरम्यान होते. आरोग्य विभागाच्या म्हणण्यानुसार मम्मस हा आजार पॅरामीझोवायसर या विषाणूमुळे होतो. वडवणी तालुक्यात मोठ्या प्रमाणात बालकांना व नागरीकांना आजाराचा संसर्ग झाला असून सध्या लाळ ग्रंथि सुजणे, ज्यामुळे चेहऱ्यावर, गळ्यावर, गालावर सूज ताप, अशक्तपणा आणि अंगदुखी ही लक्षणे दिसत आहेत. हवेतून ड्रॉपलेट किंवा खोकल्याद्वारे व लाळेद्वारे आजार पसरतो.

वेळीच उपचार करून घ्यावा.

आजाराच्या प्रतिबंधासाठी नियमित लसीकरण करून घेणे, आजारी व्यक्तींचा संपर्क टाळणे हेच उपाय असून लक्षणे

दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांना दाखवणे व उपचार घेणे गरजेचे असल्याचे वडवणी तालुका आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, शहर व परिसरात डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी नगर पंचायत प्रशासनाने नियमित धूर फवारणी करण्याची गरज आहे. तसेच आरोग्य विभागाकडूनही पाणी नमुने तपासणी करणे गरजेचे आहे. नागरिकांकडूनही अशी मागणी होत आहे.

# ऐतिहासिक फायरींग रेंजचे जतन करा : छात्रसेनाधिकारी यांची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

ऐतिहासिक फायरींग रेंजचे जतन करावे तसेच या परिसराची स्वच्छता करून हा परिसर स्वंरक्षीत व जतन करावा अशी मागणी छात्रसेनाधिकारी एस.पी.कुलकर्णी व चिप ऑफिसर शिवकुमार निर्मळे यांनी एका निवेदनाद्वारे उपजिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

अंबाजोगाई शहरात चाँदमारी परिसरात स्वतंत्र्यपुर्व काळापासून ऐतिहासिक फायरींग रेंज हे ठिकाण आहे. येथे पुर्वी सैन्यदलाला फायरींगच्या प्रशिक्षणासाठी हे ठिकाण उपलब्ध करून देण्यात आले होते. आजही या ठिकाणी छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. ही पुरातन वास्तु आता शासनाकडून दुर्लक्षीत होत आहे. या वास्तुचे



संवर्धन व जतन करावे अशी मागणी प्रा.एस.पी.कुलकर्णी, शिवकुमार निर्मळे यांनी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेवून त्यांना या मागणीचे निवेदन दिले.

# जरांगे पाटील यांच्यासाठी बोललेला नवस सिताराम दानवे यांनी केला पूर्ण

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड येथील, सिताराम भाऊराव दानवे यांनी, मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील, दुसऱ्या टप्प्यात जे अंतरवली सराटी येथे आमरण उपोषणासाठी बसले होते. त्यावेळी त्यांच्या नाकातून जो रक्तस्राव चालू झाला होता, तो रक्तस्त्राव थांबण्यासाठी, देऊळगाव घाट चे ग्रामदैवत श्री भैरवनाथ चरणी सिताराम दानवे यांनी असा नवस



केला होता की, त्यांच्या नाकातील रक्त थांबले तर मी ११ किलो शेरनी वाटील. त्यामुळे त्यांनी आपण बोललेला नवस ११ किलो शेरनी वाटून भैरवनाथ चरणी पूर्ण केला पूर्ण केला.

त्यावेळी देऊळगाव घाट चे सरपंच रामकिसन ठोंबरे, कैलास ठोंबरे, अमोल दानवे, आदेश दानवे, मनोज बर्डे, गणगे महाराज, पत्रकार आदिनाथ ठोंबरे व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# पुर्णवाद नारी फोरमच्या वतीने सामुहिक पुजन सोहळा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील भक्ती शक्ती मंदीरात कुंकूमार्चन व सामुहिक पुजन सोहळा मोठया भक्तीभावाने साजरा झाला.

यावेळी अध्यक्षा अनघा चौधरी, सुजाता धर्माधिकारी, यशोधरा जोशी, अनिता औटी, मयुरी तोरंबेकर, राजश्री पिंपळे, ज्योती कोदरकर, पत्की, धाट, सुधीर धर्माधिकारी, राजेंद्र पंढरपुरकर आदी उपस्थित होते. उपासना, भक्ती आणि शक्ती याचे महत्व सांगुन प्रयागतीर्थ या अध्यात्मिक ग्रंथांचे वाचन करण्यात आले. सुधीर धर्माधिकारी यांनी मनोगत व्यक्त केले. कपिल गणेश महिला भजनी मंडळाच्या वतीने अभंग व धार्मिक गीतांचे गायन करण्यात आले. प्रिया पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. आरती व सामुहिक प्रार्थनेनंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला यावेळी महिला परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# सपोनि नारायण एकशिंगे आल्यापासून कारवाई धडाका सुरू; अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले

**बीड । प्रतिनिधी**

चकलांबा पोलिसांचा कारवाईचा धडाका चालूच, हायवेवरील तीन धाब्यावर धाड तसेच गैबी नगर तांडा येथील हातभट्टी अड्डा उध्वस्त ६९९० रुपये किमतीचे ११७ लिटर रसायन केले नाश २१९०० रुपये किमतीची देशी विदेशी दारू केली जागीच जप्त

चकलंबा पोलिसांची मोठी कारवाई गैबी नगर येथील हातभट्टी अड्डा उध्वस्त करत हायवेवरील तीन धाब्यावर धाड, ६,९९० रुपयाचे रसायन जागीच नष्ट २१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल केला जप्त अधिक माहिती अशी की चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे यांना गोपनीय बातमीदारांमार्फत बातमी मिळाली होती की, पोलीस ठाण्याचे हद्दीतून जाणारा २२२ नंबरच्या हायवे वरती



काही हॉटेल धाब्यावरती अवैध दारू विक्री होत आहे. माहिती मिळताच खात्री करून स्वतः सदर ठिकाणी जाऊन वेगवेगळ्या वेळी धाड टाकली असता नॅशनल हायवे क्रमांक ६१ वर हायवेवरील हॉटेल महाराजा, हॉटेल दिव्या गार्डन, हॉटेल साई श्रद्धा यावर मोठ्या प्रमाणावर देशी व विदेशी दारूचा साठा मिळून आल्याने तो लागलीच जप्त जप्त करून आरोपी नामे १) गोरख आसाराम जोगदंड रा कोळगाव ता गेवराई जि बीड

२) सतीश बाबासाहेब आहेरकर रा कोळगाव ता गेवराई जि बीड ३) रोहित दिलीप तू ळवे रा पेंडगाव ता जि बीड ४) संतोष किसन जाधव वय ३२ राहणार गैबी नगर तांडा तालुका गेवराई जिल्हा बीड यास ताब्यात घेऊन दारूबंदी कायदा कलम( ६५)( इ ),(६५)( फ ) नुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार ४३ बारगजे, पोलीस हवालदार येळे करत आहेत

सदरची कारवाई ही माननीय पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एक शिंगे, पोलीस उपनिरीक्षक तांगडे, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे, प्र पोलीस उपनिरीक्षक कुमावत पो ह येळे, पो शी खटाणे पो शी सुरवसे, चालक पोलीस हवालदार सानप. चालक पोलीस शिपाई गर्जे यांनी केली आहे. सपोनि नारायण एकसिंगे आल्यापासून चकलांबा पोलिस ठाण्ये अंतर्गत अवैध धंदे वाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

# निष्ठावंतांना सोबत घेत डॉ.नरेंद्र काळे यांचा बंडाचा झेंडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गेल्या महिनाभरापासुन बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) चे उमेदवार म्हणून संपुर्ण जिल्हा पिंजून काढला. शरद पवारांनीही त्यांना वेळोवेळी पाठबळ देत त्यांचे कौतुक केले. मात्र अचानकच बजरंग सोनवणे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. संभाव्य उमेदवार म्हणून सोनवणेंची चर्चा सुरू होताच. अंबाजोगाईत निष्ठावंतांना सोबत घेत डॉ.नरेंद्र काळे यांनी बंडाचा झेंडा उभारला की काय? अशी राजकिय चर्चा आता सुरू झाली आहे.

शनिवारी अंबाजोगाईत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट यांची निष्ठावंत कार्यकर्त्यांची बैठक झाली. ही बैठक नव्हे तर डॉ.नरेंद्र काळे यांचे शक्तीप्रदर्शन म्हणावे लागेल. केज विधानसभा मतदार



**बैठकीच्या नावाखाली झाले शक्तीप्रदर्शन**

संघ हा बजरंग सोनवणे यांचा होमस्पीच वरील सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी यांना अंबाजोगाईत बोलावून काळेंनी बजरंग सोनवणे यांच्या उमेदवारी समोर आव्हान उभे केले आहे. या बैठकीस अंबाजोगाई, केज, धारूर, नेकनुर, वडवणी, परळी, माजलगाव व जिल्ह्यातील इतर ठिकाणाहून कार्यकर्ते व पदाधिकारी या बैठकीस उपस्थित राहिले होते. गेल्या लोकसभा निवडणूकीत सोनवणेंना उमेदवारी मिळाली. आता त्यांनी मोठ्या मनाने आपल्याला संधी द्यावी अशी मागणी ही डॉ.काळे यांनी या बैठकीत केली. ज्या वेळी पक्षाला सच्चा कार्यकर्त्यांची गरज होती. त्यावेळी अनेकांनी इतरत्र उड्या मारल्या. पळुन गेलेल्या अनेक लोकांसोबत आपली लढाई आहे. तर मग या लढाईसाठी निष्ठावंतच पाहिजे अशी ठोस भूमिका डॉ.नरेंद्र काळे यांनी मांडली.सोनवणे यांच्या उमेदवारी अगोदरच आपली उमेदवारी मजबूत व्हावी यासाठी आजचा मेळावा निष्ठावंतांच्या उपस्थितीत झाल्याचे नमुद केले.

# ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त शुभांगी कचरे यांचा विविध पुरस्काराने सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त लातूर येथे झालेल्या मेकअप सेमिनार मध्ये एकाच स्टेजवर चार इंटरनॅशनल मेकअप आर्स्टिट जे आहेत, अमिषा साळुंके, अनम सिद्धिकी, मनिषा गव्हाणे, अंकित कोर यांच्या हस्ते सौ.शुभांगी ज्ञानेश्वर कचरे यांना 'हिरकणी पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

अंबाजोगाई शहरातील मागील अनेक वर्षांपासुन ब्युटी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल तसेच गेल्या दहा वर्षापासुन मुली, महिलांना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देण्याचे काम ते सतत करत असतात. तसेच २० फेब्रुवारी रोजी नागपुर येथे झालेल्या स्वय सिद्धम ब्युटी फेस्टीवल येथे बेस्ट



मेकअप आर्टिस्ट या पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी भारतातल्या वेगवेगळ्या व राज्यातून अनेक आर्टिस्ट यावेळी उपस्थित हौते. १३ सप्टेंबर २०२३ रोजी सुवर्ण दिवशी 'महाराष्ट्र बिझनेस ॲवार्ड' या पुरस्काराने त्या समन्मानित झाल्या. ब्युटी क्षेत्रात सतत कार्यरत असणार्या सौ.शुभांगी कचरे यांचे उल्लेखनीय कार्य लक्षात घेता वरील सर्व पुरस्कार त्यांच्या कार्याची ओळख करून येतात. 'महाराष्ट्र बिझनेस ॲवॉर्ड' हा नाशिक येथे हा कार्यक्रम पार पडला. सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, प्रार्थना बहिरे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. संस्कृती ब्युटी ॲकॅडमी खोलेश्वर कॉलेज रोड, आंबेडकर चौक, अंबाजोगाई येथे खास अंबाजोगाई व परिसरातील युवतींसाठी घेवून येत आहेत. ब्युटी पार्लर प्रशिक्षण ते ही मोफत खालील सपंर्क करण्यासाठी मोबाईल क्रमांक - ८७८८०२६९८७, ९१५६२४१८९२

# भारतीय बौद्ध महासभा माजलगाव शाखेच्या वतीने फाल्गुन पोर्णिमा साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव तालुका शाखेच्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे वर्ष भरातील सर्व पोर्णिमा तसेच सर्व महापुरुषांच्या जयंत्या विविध उपक्रमाने साजरी केल्या जातात याचाच एक भाग म्हणून दि २४ मार्च २०२४ वार रविवार रोजी फाल्गुण पोर्णीमा साजरी करण्यात आली त्याच निमित्तान मागील महिन्यात साजरा करण्यात आलेल्या त्यागमुर्ती माता रमाई व बुद्ध मुर्ती शुशोभिकरण कामाचा जमा खर्च हिशोब बैठक आयोजित करण्यात आली होती या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या महिला उपाध्यक्षा आद.लिलाताई उजगरे या होत्या या कर्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संस्कार



सचिव बीड पुर्व आद.शामभाऊ वाघमारे, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या महिला सरचिटणीस शोभाताई भोजने, जिल्हा पर्यटन सचिव आद.के व्ही साळवे सर वंचित बहुजन आघाडी चे नेते आद.अंकुश आण्णा जाधव,आद. भारत तांगडे आद.धम्मानंद साळवे ,सेलापुरीच्या उपसरपंच शुशीलाताई घडसे, पत्रकार सुहास बोराडे, बौद्धाचार्य शुद्धोधन शिंदे,क्रांतीसुर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अशोक मगर, नाथाजी घडसे बहुजन समाज पार्टी चे महासचिव हरिभाऊ साळवे, इंजिनियर नवनाथ गायकवाड,अश्विन टाकणखार, दिनेश निसर्गंध,बळीराम सिरसट, माजीसैनिक शंकर वाघमारे सह तालुक्यातील धम्म उपासक उपासिका उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य डी पी पोटभरे आप्पा यांनी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे ता संस्कार उपाध्यक्ष डॉ भागवत साळवे यांनी केले यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी पी वाघमारे नाना यांनी मानले या ठिकाणी डॉ भागवत साळवे यांनी त्यागमुर्ती माता रमाई यांची जयंती व बुद्ध मुर्ती शुशोभिकरण कामाचा जमा खर्च हिशोब अहवाल सर्वांन समोर वाचुन दाखवला या वर विचार विनिमय करुन सर्व उपस्थित पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका यांच्या समोर हिशोब प्रमाणित करण्यात आला या

ठिकाणी ,आद के व्ही साळवे सर यांनी फाल्गुण पोर्णिमा चे महत्व पटवुन दिले व बौद्धाचार्य शुद्धोधन शिंदे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा चे महत्व पटवुन देत बावीस प्रतिज्ञा चा जास्तीत जास्त प्रचार प्रसाराचे काम धम्म प्रचारकांनी करावा असे प्रतिपादन केले तसेच शामभाऊ वाघमारे, पत्रकार सुहास बोराडे यांनी मार्गदर्शन केले बौद्ध धम्म ग्रामीण भागा पर्यंत पोहचवण्याच काम भारतीय बौद्ध महासभा करत आहे व पुढेही भारतीय बौद्धमहासभेलाच करावे लागेल असे प्रतिपादन आद लिलाताई उजगरे यांनी अध्यक्षिय समारोपात केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या मंदाताई साळवे, विशाखाताई वाघमारे, मायाताई स्वामी, प्रकाश साळवे,दयानंद साळवे ,भानूदास साळवे , मोहन काकडे,भगवान डोंगरे, बाबासाहेब घनघाव , रेखाताई भारसकर, शारदाताई तांगडे, अनुराधाताई साळवे,नितिन डोंगरे, भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधीकारी यांनी परिश्रम घेतले.

cmyk

# पपईच्या एका झाडाला तब्बल २०० हून अधिक पपया

## भोर तालुक्यातील शेतकऱ्याचा रेकॉर्ड!

पुणे : भोर तालुक्यातील वेळू गावातील सुभाष घुले या शेतकऱ्याने पपई मध्ये उत्पादन घेण्याचा रेकॉर्ड केला आहे. यासाठी संबंधीत शेतकऱ्याने याचा बारीक अभ्यास केला आणि योग्य पद्धतीने सर्व बाबींची काळजी घेतली. घुले नावाच्या या शेतकऱ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

घुले यांनी साई हायटेक नर्सरी, सिंगापूर (ता. पुरंदर) येथून पपईची ३५ रोपे आणली होती. बांधावर अर्धा फुटाचा खड्डा घेऊन कुजलेला पालापाचोळा, शेणखत आणि माती याचे मिश्रण करून खड्डे भरून घेतले. जुलै २०२२ मध्ये लागण करताना पपईची रोपे जीवामृतामध्ये बुडवून खड्ड्यात लागवड केली यामुळे किडी आणि रोगांपासून पपई रोपांचे संरक्षण झाले.

सहा महिन्यांत पपईला फुले आल्यानंतर ठिबक सिंचनाद्वारे पहिल्या तीन महिन्यांत आठवड्यातून एकदा अर्धा लीटर जीवामृतचा पपईच्या झाडांना डोस दिला. सहा महिने ते एक वर्ष यामध्ये महिन्यातून चारवेळा दोन लीटर जीवामृत दिले. तसेच चार दिवसांतून एकदा पाणी दिले. खोडापाशी सुकलेला पालापाचोळा, वाळलेल्या काड्या, नारळाच्या शेंड्या, भाताचा कोंडा, काड, पालापाचोळा, गुरांचे उष्टावळ, वाळलेले निकृष्ट गवत वापरून जमिनीवर आच्छादन केले यामुळे जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन कमी



झाले, व जमिनीत पाणी आणि ओलावा टिकून राहिला. आच्छादनामुळे तण नियंत्रण करणे सोपे झाले, तसेच गांडुळाची संख्या वाढून जमीन भुसभुशीत राहण्यास मदत झाली. पाण्याचा योग्य निचरा झाला.

छाटणीने फांद्या व पपईच्या फळांच्या संख्येत वाढ होते. साधारणपणे दोन महिन्यांत पपईची दोन फुटांपर्यंत वाढ झाल्यावर पपईची छाटणी सकाळी करून घेतली. छाटणी केलेल्या शेंड्यावर देशी गाईच्या शेणाचा लेप दिला. त्यानंतर १५ दिवसांनी सरासरी पाच ते सात फांद्या आल्या. झाडाच्या फांद्यांची संख्या वाढल्याने पपईचे उत्पादन वाढविण्यासाठी मदत झाली. परागीभवनामुळे शेतातील उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली. पश्चिमेकडून पूर्वेकडे वाऱ्याची दिशा असल्याने पपईच्या झाडांची लागवड पश्चिमेकडील बांधावर केली आहे. जेणेकरून पूर्वेकडील फळबाग, फळभाज्या यांच्या परागीकरणास मदत होऊन फळनिर्मिती जास्त होण्यास मदत होईल.

शेतावर दोन देशी गाईंच्या सहाय्याने तीन एकर क्षेत्र पिकवत आहेत. देशी गायीपासून गोमूत्र व शेण मिळते. याचा वापर जीवामृत तयार करताना होतो. २०० लीटर पाणी, १० किलो देशी गायीचे शेण, ५ लीटर देशी गायीचे गोमूत्र, १ किलो गूळ, १ किलो बेसन, मूठभर बांधावरची जिवाणूयुक्त माती हे मिश्रण काठीने मिसळून दिवसातून दोनदा सकाळ व संध्याकाळ काठीने ढवळले. ड्रमच्या तोंडावर गोणपाट झाकून ते ४८ तासांकरिता सावलीत ठेवले. महिन्यातून दोन वेळा पाच लीटर प्रति झाड असे दिले. अशाप्रकारे घुले यांनी जास्तीत जास्त जीवामृत वापरून विषमुक्त पपईचे उत्पादन घेतले. यामुळे पपईला ६० रुपये किलोने बाजारभाव मिळाला. पपईची विक्री थेट बांधावर झाली तसेच ऑनलाइन सुद्धा या पपईला प्रचंड मागणी होती.

# लाखोंची नोकरी सोडली, शेतीची वाट धरली

## आज वर्षाला तरुण कमवतोय करोडो रुपये



अलिकडच्या काळात अनेक तरुण शेती क्षेत्रात पाऊल ठेवत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं शेतीतून भरघोस उत्पादन घेत आहेत. तर काही तरुण चांगली नोकरी सोडून शेती करत असल्याचं चित्र दिसत आहे. आज आपण अशाच एका तरुणाची यशोगाथा पाहणार आहोत. या तरुणाने इंजिनियरींगची नोकरी सोडून शेती करण्यास सुरुवात केलीय. प्रमोद गौतम असं या शेतकऱ्याचं नाव आहे. हे तरुण शेतकरी आज वर्षाला करोडो रुपये कमावत आहेत.

प्रमोद गौतम या तरुण शेतकऱ्याने इंजिनियरींगची नोकरी सोडून यशस्वी शेती केली आहे. यातून ते महिन्याला लाखो रुपये कमावत आहेत. प्रमोद यानी इंजिनियरींग आणि एमबीएचं शिक्षण घेतलं आहे. या शिक्षणानंतर त्यांना मोठ्या पगाराची नोकरी लागली होती. परंतू त्यांनी काही काळानंतर नोकरीला रामराम करत शेती करण्याचा निर्णय घेतला.

बहुराष्ट्रीय ऑटोमोबाईल कंपनीतील चांगली नोकरी सोडून शेतीचा निर्णय

प्रमोद गौतम हे मुळचे नागपूरचे आहेत. त्यांनी बहुराष्ट्रीय ऑटोमोबाईल कंपनीत चांगली नोकरी लागली होती. त्यांना चांगला पगारही मिळत होता. पण २००६ मध्ये प्रमोद गौतम यांनी नोकरी सोडून शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यांना वडिलोपार्जित २६ एकर जमीन होती. यामध्ये त्यांनी नोकरी सोडून शेती सुरु केली. या शेतात प्रमोद यांनी फळबागांसह मूग डाळीचं पीक घेतलं आहे. सुरुवातीच्या काळात प्रमोद यांनी भाजीपाल्यासह हळद, भुईमूग या पिकांचे उत्पादनही घेतले होते. मात्र त्यानंतरच्या काळात त्यांनी मूग डाळीचं उत्पादन घेण्याचा निर्णय घेतला. या डाळ पिकाचा त्यांना सध्या मोठा नफा होत आहे.

वंदना फूड्स नावाचा नवा डाळ ब्रँड

प्रमोद गौतम यांनी नागपुरात वंदना फूड्स नावाचा नवा स्वत:चा डाळ ब्रँड सुरू केलाय. या ब्रँडच्या नावाखाली प्रमोद हे विविध प्रकारच्या डाळी आणि धान्य विक्री केलं जाते. प्रमोद यांचे प्रोडक्ट आणि वर देखील उपलब्ध आहे. डाळीच्या विक्रीतून प्रमोद गौतम हे वर्षाला १ कोटी रुपये मिळवतात. तर शेतीतून त्यांना वर्षाला १० ते १२ लाख रुपये मिळतात. दरम्यान, प्रमोद गौतम यांनी सुरु केलेल्या शेती प्रयोगाचे सर्वच स्तरातून कौतुक केलं जातंय. ते अनेक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

# देशी आणि जर्सी गाय यामधील फरक

देशी गायीला भारतीय गाय म्हणतात. या बॉस इंडिकस श्रेणीतील गायी आहेत. ते लांब शिंगे आणि मोठ्या कुबड्यांद्वारे ओळखले जातात. ही गाय निसर्गाने विकसित केली आहे. उत्तर भारतात देशी गायींच्या अनेक जाती आढळतात. देशी गायी उष्ण तापमानात राहतात. या गाईची दूध क्षमता खूप चांगली आहे.

शेतकरी आणि पशुपालक त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अनेक प्रकारची दुभती जनावरे पाळतात. आजच्या काळात पशुपालन हा उत्तम व्यवसाय आहे. परंतु गायींची योग्य माहिती नसल्याने पशुपालकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. अशा परिस्थितीत आज आम्ही शेतकरी आणि पशुपालकांसाठी देशी आणि जर्सी गाईंशी संबंधित काही महत्त्वाची माहिती घेऊन आलो आहोत. जेणेकरून गरजेनुसार योग्य गाय पाळता येईल. आपल्या देशात गायींच्या अनेक जाती आढळतात. परंतु देशी आणि जर्सी गायींचे पालन बहुतेक पशुपालक करतात. देशी आणि जर्सी गायींमध्ये काय फरक आहे ते पाहूया.

देशी गाय : देशी गायीला भारतीय गाय म्हणतात. या बॉस इंडिकस श्रेणीतील गायी आहेत. ते लांब शिंगे आणि मोठ्या कुबड्यांद्वारे ओळखले जातात. ही गाय निसर्गाने विकसित केली आहे. उत्तर भारतात देशी गायींच्या अनेक जाती आढळतात. देशी गायी उष्ण तापमानात राहतात. या गाईची दूध क्षमता खूप चांगली आहे.

जर्सी गाय : जर्सी गाय बॉश टेरेसच्या श्रेणीत येते. जर्सी गाई देशी गायींपेक्षा जास्त दूध देतात. या गायींना लांब शिंगे आणि मोठे कुबडे नसतात. भारतात गायीची सर्वाधिक निर्यात होते. जर्सी गायी थंड हवामानात राहतात.

देशी आणि जर्सी गाय मधील फरक : १) भारतात देशी गायीला मातेचा दर्जा मिळाला आहे. तर ब्रिटनमध्ये जर्सी गाईला महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. २) देशी गाय बॉश इंडिकस कॅटेगरीत आणि जर्सी गाय बॉश टॉरस कॅटेगरीमध्ये येते. ३) देशी गायीचा विकास निसर्गावर अवलंबून असतो. देशी गायीचा विकास हा हवामानाची परिस्थिती, चाऱ्याची उपलब्धता, कामाच्या पद्धती इत्यादींवर अवलंबून असतो, तर जर्सी गायीचा विकास थंड तापमानावर अवलंबून असतो. ४) देशी गायीची शिंगे लांब असतात आणि मोठ्या कुबड्या असतात, तर जर्सी गायीमध्ये असे होत नाही. ५) देशी गायी जर्सी गायींपेक्षा आकाराने लहान असतात. ६) देशी गायी सुमारे ३ ते ४ लिटर दूध देतात. तर जर्सी गायी सुमारे १२ ते १४ लिटर दूध देतात. ७) साधारणपणे देशी गायींना मूल होण्यासाठी ३० ते ३६ महिने लागतात. मात्र जर्सी गायींना १८ ते २४ महिने लागतात. ८) एक देशी गाय आपल्या आयुष्यात १० ते १२ वासरांना जन्म देऊ शकते. त्याच वेळी जर्सी गाय अनेक वासरांना जन्म देऊ शकत नाही.






# सेंद्रिय शेतीमध्ये जैविक कीड व रोग व्यवस्थापन

''जिवो जिवोस्य जीवनम्'' म्हणजे एक जीव दुसऱ्या जीवावर जगतो. निसर्गामध्ये वावरणारे जीवजंतू हे सुद्धा एक दुसऱ्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे ते आपल्या भक्ष्याच्या शोधात असतात व त्यामुळेच निसर्गाचे संतुलन साधले जाते. सेंद्रिय शेतीमध्ये नेमका याच तत्वाचा उपयोग करून काही प्रमाणात कीड, रोग व खत व्यवस्थापन करता येते. आपण उन्हाळ्यात नांगरणी करतो. त्यामुळे बऱ्याच किडी ज्यांच्या काही अवस्था जमिनीत असतात त्यांचे उन्हाळ्यातील तीव्र उष्णतेमुळे नियंत्रण करता येते. काही बुरशीजन्य कीटकनाशके अत्यंत प्रभावी आढळून आले आहेत. ज्यामध्ये मेटॅरायझियम ॲनिसोप्ली, बेव्हेरीया बॅसियाना, नोमोरिया रिली, व्हरटीसिलीयम लेक्यानी, पॅसिलोमायसीस लील्यासिनस या बुरशींचा समावेश होतो, तर जिवाणूजन्य कीटकनाशकामध्ये बॅसीलस थुरोंजेनीसीस तर एच. एन. पी. व्ही. हा विषाणू कीड नियंत्रणात उपयोगात येत आहे.

मेटॅरायझियम या बुरशीमुळे मावा, तुडतुडे, पांढरी माशी, फुलकिडे, हुमनी, बोंडअळी, खोडकिडा (ज्वारी) तर बेव्हेरीया या बुरशीमुळे मावा, ज्वारीवरील खोडकिडा, भातावरील काटेरी भुंगा, बोंडअळी, तुडतुडे, तंबाखुची पाने खाणारी अळी, नोमोरिया या बुरशीमुळे पतंगवर्गीय कीटक जसे



बोंडअळी, उंटअळी तर व्हरटीसिलीयम लेक्यानी या बुरशीमुळे मावा, पांढरी माशी, फुलकिडे, कोळी आणि पॅसिलोमायसीस लील्यासिनस या बुरशीमुळे मुख्यत: पान व केळी पिकांवरील सुत्रकृमींचा बंदोबस्त करता येतो.

बुरशीजन्य कीटकनाशके फवारणी केल्यानंतर तोंडावाटे किंवा किडींच्या शरीरावाटे प्रवेश करून शरीरातजाळे तयार करून वाढत जाते, त्यामुळे किडींची वाढ खुंटते व अन्न खाणे बंद होते. किडीचे उच्चाटण झाल्यावर बीजाणूची पैदास होते व हेच बीजाणू नंतर दुसऱ्या किडीवर प्रादुर्भाव करतात. किडींप्रमाणे रोगनियंत्रण करण्यासाठी सुद्धा काही सुक्ष्म जिवांचा वापर करता येतो, त्यामध्ये प्रामुख्याने ट्रायकोडर्मा, बॅसीलस, सुडोमोनस, ॲस्परजिलस या सुक्ष्म जिवांचा अंतर्भाव होतो. मुख्यत: या सर्व सुक्ष्म जिवांचा वापर बिजप्रक्रिया करून त्याद्वारे बियांपासून व जमिनीतून पसरणाऱ्या रोगांचे नियंत्रण करण्यासाठी होतो. त्यामध्ये रायझोकटोनिया द्वारे होणारी मुळसड, पिथियम द्वारे होणारे रोप कोलमडणे, फ्युजारीयम द्वारा होणारा मर रोग, स्क्लेरोशियम बुरशीमुळे होणारी कुज याचा प्रामुख्याने समावेश करता येईल परंतु आता या सुक्ष्म जिवाबाबत अधिक संशोधन होऊन बियांपासून पसरणारे मुळांना होणाऱ्या रोगांचाच नव्हे तर पिकांच्या इतर भागावर येणाऱ्या रोगांना अटकाव करण्यासाठी सुद्धा अश्या बुरशी अथवा जीवाणूचा वापर होत आहे त्यात प्रामुख्याने कपाशीवरील जीवाणू करपा या रोगाचा अटकाव सुडोमोनस या उपयोगी जीवाणूद्वारे करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे इतरही पानावरील ठिपके या रोगाचे व्यवस्थापनासाठी या जीवाणूचा प्रभावीपणे वापर होत आहे. तसेच ॲम्पेलोमायसेस क्विसकॅलिस बुरशीचा वापर भुरी (पावडरी मिल्ड्यु) रोगाच्या नियंत्रणासाठी केला जातो. इतकेच नव्हे तर काही सुक्ष्म जिवांचा उपयोग पिकांना अन्नद्रव्यांचा पुरवठा करण्यासाठी होतो व त्यामुळे अनेक मुलद्रव्यांचा योग्य पुरवठा करता येतो. त्यामध्ये मुख्यत: रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर, ॲझोस्पायरीलम, स्फुरद विघटन करणारे सुक्ष्म जीव, निळे हिरवे शेवाळ यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५७ : प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नबाबाचा पराभव केला. या विजयामुळे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा पाया घातला गेला आणी ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने कोलकाता काबीज केले.

१७८८ : 'कलकत्ता गॅझेट' या वृत्तपत्रामध्ये भारतीय बंगाली भाषेतील पहिली जाहिरात प्रकाशित करण्यात आली.

१८०७ : गुलाम व्यापार कायदा करून ब्रिटिश साम्राज्य मध्ये गुलामांचा व्यापार बंद करण्यात आला.

१८०७ : इंग्लंड देशांमध्ये प्रथम रेल्वे प्रवासी सेवा सुरू करण्यात आली.

१८८१ : लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या 'मराठा' या दैनिकाची सुरूवात झाली.

१८८५ : पुणे यथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले.

१८९८ : शिवराम परांजपे यांनी साप्ताहिक 'काळ' चा पहिला अंक काढला.

१८९८ : स्वामी विविकानंद यांनी भगिनी निवेदिता यांना ब्रह्मचर्याची दीक्षा दिली होती.

१९०५ : मांचुरियातील पोर्ट ऑर्थर सिटी येथील लढाईत जपानी सैन्याने रशियाचा पाडाव केला. आशियाई देशाने युरोपातील देशाचा केलेला पराभव ही त्या काळातील अतिशय महत्त्वाची घटना होती.

१९२९ : लाहोर काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन सुरू झाले.

१९३६ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना

१९४२ : दुसरे महायुद्ध जपानी फौजांनी मनिला, फिलिपाइन्सवर ताबा मिळवला.

१९४५ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी न्यूरेम्बर्ग, जर्मनी येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.

१९५४ : राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी 'भारतरत्न' पुरस्कारांची स्थापना केली.

१९८९ : मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार सफदर हश्मी यांची नवी दिल्ली येथे पथनाट्य करत असतानाच निर्घृण हत्या

१९९७ : जगदीश शरण वर्मा यांनी भारताचे २७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

१९९८ : डॉ. सरोजिनी बाबर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते सन्माननीय डी. लिट. पदवी प्रदान

२००० : १७ वर्षीय जलतरणपटू रुपाली रेपाळे हिने दक्षिण आफ्रिकेतील रॉबेन आयलंड खाडी पोहून पार केली. ही खाडी पोहणारी ती वयाने सर्वात लहान जलतरणपटू आहे.

२००० : पनामा सरकारने ८५ वर्षांच्या कालखंडानंतर पनामा कालव्याचा पूर्ण ताबा घेतला.

२००० : संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेल्या चलनी नाण्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते प्रकाशन.

२०१३ : मणिपूर उच्च न्यायालयाची स्थापना

२०१३ : मेघालय या केंद्रशाशित प्रदेशाची राजधानी शिलांग येथे उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली.

२०१७ : राजस्थान राज्याच्या बिकानेर शहरातील महिला तनुश्री परीक यांनी भारत देशाच्या सीमा सुरक्षा बल(बीएसएफ) च्या महिला अधिकारी बनून आपल्या देशाचे व राज्याचे नाव उज्वल केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९६ : सुप्रसिध्द कादंबरीकार र.वा. दिघे.

१८३८ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या संस्थापक सदस्यांमधील एक सर विल्यम वेदरबर्न यांचा जन्मदिन. त्यांनी सन १८८९ साली काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले आहे.

१९१४ : अमेरिकन कृषी शास्त्रज्ञ व हरित क्रांतीचे जनक नॉर्मन अर्नेस्ट बोरलॉग यांचा जन्मदिन

१९१८ : ब्रिटीश भारतीय सैन्य दलाचे अधिकारी कर्नल प्रेम कुमार सहगल यांचा जन्मदिन

१९२० : आयझॅक असिमॉव्ह अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (मृत्यू: ६ एप्रिल१९९२)

१९३२ : व.पु. काळे, मराठी साहित्यिकगव्हाची पीक देणारी जात शोधून काढणारे शास्त्रज्ञ नॉर्मल बोरलॉग

१९३२ : हरचंदसिंग लोंगोवाल अकाली दलाचे अध्यक्ष (मृत्यू: २० ऑगस्ट १९८५)

१९३३ : अंतराळ संशोधक वसंतराव गोवरीकर

१९४८ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेता फारुख शेख यांचा जन्मदिन.

१९५६ : ग्वाल्हेर घराण्याचे गायक मुकूल शिवपुत्र यांचा जन्म.

१९५९ : किर्ती आझाद क्रिकेटपटू आणि खासदार

१९६० : रमण लांबा क्रिकेटपटू (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९९८)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१६ : अल्लाउद्दीन खिलजी दिल्लीचा सुलतान (जन्म:)

१९३१ : भारतीय पत्रकार आणि राजकारणी गणेश शंकर विद्यार्थी यांचे निधन. (जन्म: २६ ऑक्टोबर १८९०)

१९३५ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे काँग्रेस नेते, वकील (जन्म: १९ ऑगस्ट १८८६)

१९४० : आसामी कादंबरीकार उपन्यास सम्राट रजनीकांत बर्दोलोई यांचे निधन. (जन्म: ११ डिसेंबर १८६७)

१९४३ : हुतात्मा वीर भाई कोतवाल (जन्म:)

१९४४ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (जन्म: २३ एप्रिल १८७३)

१९७५ : सौदी अरेबियाचा राजा फैसल यांचे निधन

१९८९ : सफदर हश्मी मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (जन्म: १२ एप्रिल १९५४)

१९९१ : जयपूर-अत्रौली घराण्याचे गायक वामनराव सडोलीकर यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९०७)

१९९३ : सुप्रसिध्द लेखक मधुकर केचे.

१९९९ : विमला फारुकी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या आणि महिला चळवळीतील कार्यकर्त्या (जन्म:)

२००२ : अनिल अग्रवाल पर्यावरणवादी (जन्म: १९४७)

२०१४ : भारतीय चित्रपट अभिनेत्री नंदा यांचे निधन

# नवीन संच मान्यतेचे निकष रद्द करा

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची मागणी

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांचे संच मान्यता करताना सुधारित निकष नुकतेच जाहीर करण्यात आले आहेत. यामुळे राज्यातील हजारो शिक्षक अतिरिक्त होणार असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता पूर्ण शिक्षणावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली या पार्श्वभूमीवर शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा.बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार अधिनियम २००९ तील मूळ तरतुदीप्रमाणे संच मान्यता करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत शालेय प्रधान सचिव यांना निवेदनाद्वारे केली आहे.



शालेय शिक्षण विभागाने १५ मार्च रोजी शासन निर्णय पारित करून सन २०२४-२५ साठी संच मान्यतेचे सुधारित निकषास मान्यता दिली आहे हे निकष देशाच्या शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदींचा भंग करणारे आहेत. राज्यातील २० पेक्षा कमी पट असलेल्या वाडी, वस्ती,तांडे व दुर्गम तसेच आदिवासी बहुल क्षेत्रातील प्राथमिक वर्गाकरिता एकच शिक्षक मिळणार आहे. तसेच दहा पटाच्या आतील शाळेला सेवानिवृत्त शिक्षक नेमण्याचे धोरण शासनाने राबवले आहे. एकीकडे राज्यात हजारो डी.एड. पात्रता धारक विद्यार्थी नोकरीच्या प्रतीक्षेत असताना सेवानिवृत्त शिक्षकांना नेमणूक देऊन शासन तरुण शिक्षकांना रोजगारापासून वंचित ठेवण्याचे पाप करीत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच एका शिक्षकास २ ते ३ वर्गाचे अध्यापन करावे लागणार आहे. त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील शाळेत शिकवणाऱ्या बालकांना शिकविण्यास पुरेसे शिक्षक उपलब्ध होणार नाहीत.त्यामुळे त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होणार आहे.

पटसंख्या १३५ पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद राहणार नाही.त्यामुळे राज्यातील अनेक शाळा मुख्याध्यापकाविना असणार आहेत. त्याचा शाळेच्या व्यवस्थापनावर परिणाम होऊन शिक्षकांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होणार नाहीत. हे निकष नैसर्गिक न्यायास धरून नसल्याचे प्राथमिक शिक्षक समितीची धारणा आहे नवीन निकष रद्द करून शिक्षण हक्क कायद्यातील मूळ तरतुदीप्रमाणे संच मान्यतेचे निकष कायम ठेवावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती च्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी राजेंद्र खेडकर राज्य संघटक, दिलीप खाडे मराठवाडा विभाग मार्गदर्शक,अरूण घुले,महेश सातपुते जिल्हाध्यक्ष, सुरेंद्र गोल्हार जिल्हा सरचिटणीस, योगेश सोळसे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख, राहुल उंडाळे जुनी पेन्शनआघाडी विभाग समन्वयक, सर्व तालुकाध्यक्ष भाऊसाहेब बांगर पाटोदा,कैलास शेकडे आष्टी,अनंत सानप शिरूर, विशाल कुलकर्णी गेवराई,केशव बादाडे माजलगाव,विठ्ठल पवार बीड,सुंदर डोंगरे वडवणी,अर्जुन मुंडे धारूर,रत्नाकर फड परळी,बापूराव फड अंबाजोगाई,राहुल काकनाळे केज व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# ॲड.सुधाकरराव देशमुख यांचे तत्त्वनिष्ठतेचे अधिष्ठान दिशादर्शक:डॉ.ओमप्रकाश शेटे



माजलगाव । प्रतिनिधी

आयुष्याचा प्रत्येक टप्प्यावर नैतिकता व ध्येयवादाला अनन्यसाधारण महत्व देवून राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात ॲड.सुधाकरराव देशमुख यांनी तत्त्वनिष्ठतेचे अधिष्ठान ठेवून केलेले कार्य नव्या पिढीला दिशादर्शक आहे असे प्रतिपादन आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी केले. कै.ॲड.सुधाकरराव देशमुख स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित स्मृतिगंध या कार्यक्रमात जिल्ह्याचे भूमिपुत्र 'आरोग्यदूत' डॉ.ओमप्रकाश शेटे व सौ. शिल्पाताई शेटे यांना ॲड.सुधाकरराव देशमुख स्मृती पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांची तर व्यासपीठावर शर्मा, भिलेगावकर, देशमुख, शिरीष देशमुख, संयोजिका ॲड.सुलभा देशमुख, डॉ.सचिन देशमुख, डॉ.रोहिणी देशमुख यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी ॲड.सुधाकरराव देशमुख यांच्या विधायक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत स्मृती प्रतिष्ठान सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेने कार्यरत असल्याचे सांगितले.याप्रसंगी अध्यक्षीय समारोपात माजी आ.डी.के.देशमुख म्हणाले की,एकटा विरोधकही सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवून जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करू शकतो हे ॲड.सुधाकरराव देशमुख यांनी जिल्ह्याच्या राजकारणात दाखवून दिले तसेच त्याच्या सर्व क्षेत्रातील कार्याला नैतिकतेचे अधिष्ठान होते.यावेळी माजी आ.डी.के.देशमुख यांनी डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या आरोग्य क्षेत्रातील पारदर्शक कार्याची प्रशंसा करत त्यांचे अभिनंदनही केले. याप्रसंगी संतोष मुळी आणि सुमंत गायकवाड यांनी ॲड. सुधाकरराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आपल्या मनोगतातून उलगडले. प्रास्ताविक डॉ.सचिन देशमुख यांनी केले ,मान्यवरांचा परिचय संतोष जोशी यांनी तर सूत्रसंचालन हिमांशू देशमुख आणि आभार मोरेश्वर मसलेकर यांनी मानले.यावेळी कार्यक्रमास शहरातील डॉक्टर, वकील,शिक्षक,व्यापारी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

# पहाडी पारगाव प्रीमिअर लीगची ट्रॉफी रेणुका क्रिकेट क्लब देवडी संघाने जिंकली

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथे माजी सरपंच बंडूभाऊ मस्के व तारकेश्वर क्रीडामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पहाडी पारगाव प्रीमिअर लीगचा अंतिम सामना भीमगर्जना क्रिकेट क्लब धारूर विरुद्ध रेणुका क्रिकेट क्लब देवडी या संघात शनिवार दि.२३ मार्च २०२४ रोजी तारकेश्वर क्रीडांगणामध्ये संपन्न झाला. पीपीएल प्रीमियरलीच्या अंतिम सामन्यात रेणुका क्रिकेट क्लब देवडी संघाने प्रथम फलंदाजी करताना दहा षटकामध्ये २ गडी बाद १२१ धावांचा डोंगर उभा केला व १२२ धावांच लक्ष भीमगर्जना क्रिकेट क्लब धारूर या संघापुढे ठेवले या धावसंख्येचा पाठला करताना दहा षटकात ९ गड्यांच्या मोबदल्यात ७० धावाच भीमगर्जना क्रिकेट क्लब धारूर संघ काढू शकला व ५१ धावाने रेणुका क्रिकेट क्लब देवडी संघाने दणदणीत अंतिम सामना जिंकला. अंतिम सामन्याचा सामनावीर व मालिकावीर फलंदाज कलीम शेख ठरला तर मुकुंद लंगडे या प्रीमियर लीग मध्ये हॅट्रिक करणारा एकमेव बॉलर ठरला तर पहाडी पारगांव प्रीमिअर लीगच्या ऑरेंज कॅपचे मानकरी ईश्वर नाईकवाडे तर पर्पल कॅपचे मानकरी बाळासाहेब सावंत ठरले.



तारकेश्वर क्रीडांगणामध्ये बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला सर्व मान्यवरांचे शाल,पुष्पगुच्छ देऊन संयोजन समितीने स्वागत केले अंतिम सामना जिंकणाऱ्या रेणुका क्रिकेट क्लब देवडी संघाला पीपीएल प्रीमिअर लीगची ट्रॉफी व ५१००० रुपयाचं पारितोषिक माजी सरपंच तथा संजय गांधी निराधार योजनेचे धारूर तालुका समितीचे सदस्य ज्यांना भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणून संबोधलं जाते ज्यांनी ५१००० हजार रुपयांचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ठेवले ते बंडूभाऊ मस्के तसेच बीड जिल्हा कोळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य श्री.गोरख आबा पूर्णे तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे धारूर तालुकाध्यक्ष तथा सेवा सहकारी सोसायटीचे संचालक श्री.सटवा अंडील,युवा उद्योजक गणेश मुंडे,गोकुळ टायरचे प्रो.भागवत अंडील,माजी ग्रामपंचायत सदस्य विलास तात्या मुंडे,राष्ट्रवादी पार्टीचे युवा नेते सुरेश भाऊ अंडील,श्री.सुरेश गणेश अंडील,लॅब असिस्टंट सुरेश अंडील,ग्रामपंचायत सदस्य अशोक पाटोळे,संचालक किशोर नाना अंडील यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले. पीपीएल प्रीमिअर लीगचा उपविजेता संघ भीमगर्जना क्रिकेट क्लब धारूर या संघाला ट्रॉफी व ३१००० रुपयाचे पारितोषिक बीड जिल्ह्याचे कोळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्री.गोरख आबा पूर्णे व माजी सरपंच बंडूभाऊ मस्के यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले तर तृतीय क्रमांकाच्या संघाला ट्रॉफी व ११००० रुपयांचे पारितोषिक राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे धारूर तालुकाध्यक्ष तथा संचालक सटवा अंडील यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले चतुर्थ क्रमांक च्या संघाला ७७७७ रुपयाचे पारितोषिक गोकुळ टायरचे प्रो.भागवत अंडील व संचालक किशोर नाना अंडील यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले.मालिकावीर कलीम शेख यांना सायकलचे पारितोषिक युवा उद्योजक गणेश धर्मराज मुंडे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले तर ऑरेंज कॅप ईश्वर नाईकवाडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते सुरेश अंडील यांच्या शुभहस्ते देण्यात आले तर पर्पल कॅप बाळासाहेब सावंत या खेळाडूला भागवत अंडील यांच्या शुभहस्ते देण्यात आले तर अंतिम सामन्याचा सामनावीर फलंदाज कलीम शेख यांना २१०० रुपयांचे पारितोषिक सुरेश गणेश अंडील व रमेश अंडील यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व या प्रीमिअर लीगचे प्रसिद्धी प्रमुख युवा नेते बाजीराव अंडील यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार युवा उद्योजक उमेश अंडील यांनी मानले. पहाडी पारगाव प्रीमिअर लीग मालिका खेळीमेळीच्या आणि आनंदाच्या वातावरणामध्ये संपन्न होण्यासाठी युवा उद्योजक रमेश मुंडे,माणिक तात्या मुंडे,दिनेश अंडील,ग्रामपंचायत सदस्य माणिक मस्के,युवा उद्योजक भागवत मुंडे,प्रदीप अंडील, फोटोग्राफर दादासाहेब अंडील ,मेघराज मुंडे,पवन पूर्णे आदींनी कोणत्याही कारणावरून वादांग होऊ नये,स्पर्धेला गालबोट लागू नये म्हणून प्रयत्न केले तर तारकेश्वर क्रीडा मंडळ व संयोजक समितीच्या अथक परिश्रमामुळे पीपीएल प्रीमिअर लीग यशस्वीरित्या संपन्न झाले.

# बंकटस्वामी महाराजांच्या दिंडीचे मंगळवारी होणार पैठणकडे प्रस्थान

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील ७६ वर्षाची अखंड परंपरा असलेल्या संत बंकटस्वामी महाराज यांच्या पालखीसह दिंडीचे मंगळवारी दि २६ रोजी श्रीक्षेत्र नेकनूर येथून पैठण कडे प्रस्थान होणारं आहे.. यां दिंडीत भाई भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन मठाधिपती महान लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले आहे..

वारकरी संप्रदायातील महान संत बंकट स्वामी महाराज यांचे शिष्य संत वै.संत सुदामदेव महाराज यांनी सुरू केलेल्या पालखी सह दिंडी सोहळयाचे या वर्षीचे ७६ वे वर्ष आहे. वैकुंठवासी रामहरी महाराज,वै. दिगंबर महाराज, यांनी परंपरा अखंड पणे चालवली.. आज तीच परंपरा समर्थपणे महंत लक्ष्मण महाराज मेंगडे चालवत आहेत.. यां दिंडीत मराठावाड्यातून हजारो वारकरी सहभागी होतात.मुक्काम दर कोस दर मजल पाई प्रवास करून पंचमी दिवशी दिंडी पैठण मध्ये पोचते. षष्ठीच्या सोहळ्यामध्ये भजन कीर्तन भारुड संगीत भजन आदी कार्यक्रम संपन्न होतात जेवणाची आणि राहण्याची मोफत व्यवस्था संस्थान च्या वतीने केली जाते. त्यामुळे दिंडी सोहळया मध्ये हजारो भावीक भक्तानी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# पाण्याचा अपव्यय टाळून व नैसर्गिक रंगांचा वापर करून धुलिवंदन साजरे करा

**पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे आवाहन**

परळी । प्रतिनिधी

होलिकेच्या पवित्र अग्नीमध्ये दुःख, दारिद्र्य आणि अहंकाराचे दहन होऊन सर्वांच्या आयुष्यात सुख समृद्धी नांदावी अशा शब्दात राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी होळी व धुलीवंदनाच्या बीड जिल्हा वासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

होळीच्या अग्निमध्ये वाईट प्रवृत्तीचे दहन करून धुलीवंदनाच्या दिवशी रंगांचा उत्सव साजरा करण्याची होळीची परंपरा आहे; यानिमित्त जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा वासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, यावर्षी बीड जिल्ह्यासह मराठवाड्यावर नैसर्गिक जलसंकट आहे. त्यामुळे धुलीवंदन-रंगपंचमी साजरी करताना पाण्याचा अपव्यय टाळावा तसेच कोणतीही शारीरिक हानी किंवा इजा करणारे रंग टाळून नैसर्गिक रंगांचा वापर करून होळी-धुलीवंदनाचे हे पर्व आनंदात साजरे करावे, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा वासीयांना केले आहे.

# शिवसंग्राम भवन येथे स्व.अण्णासाहेब पाटील यांच्या स्मृतीदिनी अभिवादन



बीड । प्रतिनिधी

शिवसंग्राम भवन येथे अ.भा. मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माथाडी कामगारांचे दैवत क्रांतिसूर्य स्व.अण्णासाहेब पाटील यांच्या स्मृतीदिनी शिवसंग्राम परिवाराच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते तथा भारतीय संग्राम परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर आप्पा कोलंगडे, शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण दादा काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, सुहास पाटील, युवा नेते मनोज जाधव, शहर उपाध्यक्ष शेषेराव तांबे, शिरूर कासारचे तालुका उपाध्यक्ष नामदेव धांडे, शिवसंग्राम नेते सतीराम ढोले,गणेश धोंडरे,संदीप नवले,अशोक ढोले, प्रकाश तावरे, सरपंच रेवणनाथ धांडे,बालाजी गीते,सचिन जोशी व अन्य शिवसंग्राम पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# क्षेत्र अश्वत्थलिंग ते श्री क्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान

## पायी दिंडी सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हा-महंत महादेवानंदजी भारती

पिंपळवंडी । प्रतिनिधी

श्री.संत श्रेष्ठ एकनाथ महाराज षष्ठी सोहळा प्रित्यर्थ सालाबादप्रमाणे याही वर्षी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनची श्री क्षेत्र अश्वत्थलिंग ते श्री क्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान उद्या दि २६ मार्च २०२४ मंगळवार रोजी होणार असून भाविकांनी बहुसंख्येने या पायी दिंडी सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थांनचे मठाधिपती श्री श्री १००८ गुरुवर्य महंत श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज यांनी केले आहे.

दि.२६ मार्च मंगळवार रोजी सकाळी ८:३० वा.श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान येथून प्रस्थान होणार असून १०:३० वा.पिंपळवंडी येथील हनुमान मंदिरात पायी दिंडीचे आगमन झाल्यानंतर येथे दिंडीतील वारकऱ्यांना चहा व नाश्ता देण्यात येऊन तसेच दुपारी १२:१५ वा.अंमळनेर येथे जेवणाची व्यवस्था होणार आहे.दि.२७ मार्च बुधवार रोजी लालपुरी (पिंपळनेर) येथे संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळा व बिजोत्सव कार्यक्रम संपन्न होईल.पायी दिंडी सोहळा दि.२६ मार्च ते २ एप्रिल यादरम्यान होत असून पायी दिंडीचा पिंपळवंडी, अंमळनेर, भडकेल, पिंपळनेर, टाकळी फाटा, तांबेवाडी, जांभळी, सोनोशी, तोंडोळी, शिंगोरी, अंतरवली (जनीची) , बेलगाव, चापडगाव, गदेवाडी या ठिकाणाहून प्रवास होऊन पायी दिंडी दि.३० मार्च रोजी पैठण येथे मुक्कामी पोहोचणार आहे.दिंडी मुक्कामी ठिकाणी हरिकिर्तन व भजनाचे कार्यक्रम संपन्न होणार आहेत.



# बजाज ग्रुपतर्फे ५,००० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार

बीड । प्रतिनिधी

बजाज ग्रुपतर्फे समाजोपयोगी उपक्रमांसाठी पुढील पाच वर्षांत रु.५,००० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 'बजाज बियाँड' या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) आणि धर्मादाय कार्यक्रमांसाठी सुरू करण्यात आलेल्या ग्रुपच्या नव्या विभागांतर्गत कौशल्य विकासावर पूर्ण लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. यामुळे येत्या काळातील २ कोटींहून अधिक तरुणांचा फायदा होणार आहे आणि भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेमुळे उपलब्ध होणाऱ्या रोजगार व उद्योग संधींचा लाभ घेण्यासाठी त्यांना सक्षम करण्यात येणार आहे. बजाज समुहाच्या उद्योगांमध्ये आणि त्यांच्या समाजसेवी प्रयत्नांमध्ये पिढ्यानपिढ्या सामाजिक जबाबदारीचे भान रुजलेले आहे. गेल्या फक्त १० वर्षांच्या कालावधीत, बजाज ग्रुपने सीएसआर उपक्रमांसाठी सुमारे रु.४,००० कोटींचे योगदान दिले आहे. या बहुतेक उपक्रमांचा भर कौशल्य व शिक्षण, आरोग्य, उपजीविका, जलसंवर्धन आणि विकासाच्या इतर क्षेत्रांवर होता.

बजाज ग्रुपतर्फे विविध संस्थांच्या माध्यमातून मानवतावादी उपक्रम राबविण्यात येतात. यात जमनालाल बजाज फाउंडेशन, जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्था, कमलनयन बजाज हॉस्पिटल इत्यादी संस्थांचा समावेश आहे. या संस्था समुदायांच्या उन्नतीसाठी आणि सक्षमीकरणासाठी अविरतपणे काम करत आहेत. सर्व भारतीयांसाठी भरभराटीच्या आणि सर्वसमावेशक भविष्याची सहनिर्मिती करण्याचा या ग्रुपचा निर्धार आहे.

बजाज ग्रुपचे प्रमुख सीएसआर उपक्रम : बजाज इंजिनीअरिंग स्कील्स ट्रेनिंग कार्यक्रम २०२३ मध्ये सुरू करण्यात आला. इंडस्ट्री ४.०शी संबंधित असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानात इंजिनीअरिंग व डिप्लोमा पदवीधरांचे कौशल्य विकसित करणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमाच्या फ्लॅगशिप केंद्राचे यशस्वी उद्घाटन पुण्यात झाले आणि या केंद्रात १२० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. भारतभरात १५ केंद्रांची स्थापना करून या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची योजना आहे. बजाज फिनसर्व्ह लिमिटेडच्या बँकिंग, फायनान्स व इन्श्युरन्सच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या माध्यमातून उद्योगक्षेत्र आणि शिक्षण यात दुवा साधून कौशल्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. त्यामुळे फायनान्शिअल सर्व्हिस म्हणजेच वित्तसेवा क्षेत्रातील रोजगार संधींचा फायदा घेण्यासाठी टिअर २ व टिअर ३ शहरांमधील तरुणांना सक्षम करण्यात येते. या संस्थेचे अस्तित्व १४० शहरांमध्ये असून कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतभरातील ५३,००० नवपदवीधरांना प्रशिक्षित करण्यात आले आहे आणि त्यांना याचा फायदा झाला आहे. बजाज फिनसर्व्हने नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि शिक्षण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या सोबत भागीदारी केली आहे. बजाज जलसंधारण प्रकल्प संभाजीनगर जिल्ह्यातील १६१ गावांमध्ये २०१५ मध्ये सुरू करण्यात आला. जलस्रोतांचे व्यवस्थापन करण्यासाठी या गावांमधील समुदायांना सक्षम करण्यात येते. पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या विदर्भातील भागांमध्ये प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, पाणी आणि स्वच्छतेसाठी रु. १४० कोटींहून अधिक निधीचे योगदान देण्यात आले. हमारा सप्ना' हा जमनालाल बजाज ट्रस्टचा उपक्रम २०१२ मध्ये सुरू करण्यात आला. मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या वंचित महिलांच्या आयुष्यामध्ये शिक्षण आणि उद्योगाच्या माध्यमातून परिवर्तन घडविण्याचा हा प्रयत्न आहे. नियमित विकास उपक्रमांमध्ये संवादकौशल्य, संगणक कौशल्य, कायद्याचे व सामाजिक ज्ञान, वित्त व्यवस्थापन, व्यक्तिमत्व विकास, आरोग्य, स्वच्छता आणि योग यांचा समावेश आहे. या उपक्रमांवर प्रतिक्रिया देताना बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर बजाज म्हणाले, ''आमच्या उपक्रमांच्या माध्यमातून भारतातील तरुणांच्या सक्षमीकरणामध्ये परिवर्तनात्मक प्रभाव दिसून आला आहे. आज आम्ही 'बजाज बियाँड'चे अनावरण करत आहोत. भविष्यातील पिढीला यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांनी सुसज्ज करण्याचे आमचे मिशन आम्ही या माध्यमातून सुरू ठेवणार आहोत. या पुढाकाराबद्दल बजाज ऑटो लि.चे चेअरमन नीरज बजाज म्हणाले, ''बजाजच्या वारशाचे पाइक म्हणून समाजाची परतफेड करण्याच्या जबाबदारीची आम्हाला जाणीव आहे. 'बजाज बियाँड' हा आमचा नवीन उपक्रम प्रशिक्षण कार्यक्रमांपर्यंत मर्यादित नसून, त्या पलिकडे जातो.

आम्ही साकल्यवादी दृष्टिकोन सादर केला आहे. या माध्यमातून, लहान नगरे आणि शहरांमधील परिवारांमधील पहिल्या पदवीधरांना प्रशिक्षित आणि सज्ज करण्यात येते, जेणेकरून त्यांना त्यांच्या क्षमतेचा पूर्ण वापर करता येईल. वृत्ती, कौशल्य आणि ज्ञान या रोजगारक्षमतेच्या सर्व पैलूंचा विचार करून 'बजाज बियाँड' त्यांना यशस्वी करिअर घडविण्यासाठी सज्ज करते. आम्ही कौशल्यातील दरी बुजवत आहोतच, त्याचप्रमाणे आम्ही मोठ्या प्रमाणावर अष्टपैलू कुशल मनुष्यबळ घडवत आहोत, जे भारताच्या यशोगाथेला सर्वसमावेशकतेने चालना देतील आणि जागतिक पातळीवर स्पर्धा करण्यासाठी आपली अर्थव्यवस्था भक्कम करतील. हा उपक्रम लाँच करताना बजाज ऑटो लि.चे व्यवस्थापकीय संचालक राजीव बजाज म्हणाले, ''गेल्या वर्षी बजाज इंजिनीअरिंग स्कील्स ट्रेनिंग () लाँच करणे हा आमच्यासाठी महत्त्वाचा अनुभव होता. लेखी शिक्षण आणि मॅन्युफॅक्चरिंग उद्योगाला आवश्यक असलेली कौशल्ये यातील तफावतीचे स्पष्ट चित्र आम्हाला दिसून आले. च्या माध्यमातून मिळालेल्या तपशीलाचा, पाया रचण्यासाठी आधारस्तंभ म्हणून उपयोग झाला. 'बजाज बियाँड'सह आम्ही आमच्या कौशल्य उपक्रमांचे संपूर्ण समुहात विस्तारीकरण करू.

एकत्रितपणे आम्ही भविष्यसिद्ध अभ्यासक्रम तयार करू, वास्तव जगातील, प्रत्यक्ष अनुभव उपलब्ध करून देऊ आणि तरुणांना सतत बदलणाऱ्या वाहतूक क्षेत्रात उत्कर्ष करण्यासाठी आवश्यक असलेली अनुकूलन क्षमतेने सज्ज करू. बजाज फिनसर्व्ह लि.चे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज म्हणाले, ''आमचे संस्थापक जमनालाल बजाज यांच्यापासून प्रेरणा घेतलेल्या बजाज ग्रुपला समाजाच्या सकल कल्याणासाठी प्रयत्न करण्याचा आणि देशाची सेवा करण्याचा वारसा लाभला आहे. कौशल्य उभारणी हा आमच्या सामाजिक प्रभाव कार्यक्रमांचा गाभा आहे आणि तरुणांवर आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणावर या उपक्रमाचा झालेला सकारात्मक बहुगुणन प्रभाव (मल्टिप्लायर इफेक्ट) आम्ही पाहिला आहे.

बँकिंग, फायनान्स आणि इन्श्युरन्समधील आमचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सीपीबीएफआय) तरुणांना, वेगाने वाढणाऱ्या वित्तसेवा क्षेत्रात रोजगार प्राप्त करण्यासाठी सज्ज करतो. या क्षेत्रात सध्या गुणवंतांची कमतरता आहे. 'बजाज बियाँड'सह भारताच्या कौशल्य उभारणी परिसंस्थेला, विशेषतः ग्रामीण भागातील परिससंस्था भक्कम करण्याचा आमचा निर्धार आहे आणि या माध्यमातून आर्थिक समृद्धी साध्य करण्यासाठी या भागांना सक्षम करण्यात येणार आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

# पंकजाताई मुंडेंनी बंजारा महिलांसमवेत साजरी केली होळी ; पारंपरिक गाण्यावरही धरला ठेका

**विकास आणि विश्वास हाच माझ्या निवडणूकीचा मुद्दा; लेकीची लढाई सोपी करण्याचं बंजारा बांधवांनी हात उंचावून दिलं वचन**

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

मंत्री असतांना जिल्हयात केलेला विकास आणि त्यातून निर्माण केलेला विश्वास हाच मुद्दा माझा निवडणूकीत असणार आहे, आपण आशीर्वाद द्या असं आवाहन भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी बंजारा बांधवांशी संवाद साधताना केलं. लेकीची लढाई सोपी करण्याचं वचन यावेळी बंजारा बांधवांनी हात उंचावून दिलं.

पंकजाताई मुंडे यांनी आज होळीचा सण कौठळी तांड्यावरील बंजारा महिलांसमवेत मोठया उत्साहात साजरा केला तसेच पारंपरिक गाण्यावर त्यांचेसोबत फेर धरत त्यांनी ठेकाही धरला. बंजारा बांधवांनी त्यांचं तांड्यावर वाजत-गाजत मिरवणूक काढून स्वागत केलं. याप्रसंगी त्यांचेशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. सुरवातीला सर्वांना होळीच्या शुभेच्छा





देत त्या म्हणाल्या, जगात कुठेही असले तरी यापुढे होळी तुमच्यासोबत साजरी करणार आहे. लोकनेते मुंडे साहेबांवर आपण खूप प्रेम केलं, तेवढंच प्रेम मलाही दिलं. तीर्थक्षेत्र असलेल्या पोहरादेवीला मंत्री असतांना कोटयवधीचा निधी देऊन विकासाची कामे केली, दरवर्षी याठिकाणी मी दर्शनाला जात असते.

२०१४ ते २०१९ या काळात मंत्री असताना केलेला विकास आणि निर्माण केलेला विश्वास हेच माझे निवडणूकीचे मुद्दे असतील. तुमची बहिण संसदेत जाणार आहे, तुमच्यासाठी दांडपट्टा घालून संसदेत लढेन. मागे एक पुढे एक असं करणाऱ्यांवर विश्वास ठेवू नका. मुंडे साहेबांचे संस्कार आहेत, जे ओठांवर असत तेच पोटात असतं. समाजाला अंतर देणार नाही. प्रितमताईंनी खासदार म्हणून खूप छान काम केलं आहे. तुमच्यासाठी आयुष्याचा क्षण न क्षण देणार आहे. तुमच्या लेकीची लढाई सोपी करणार का? मला आशीर्वाद द्या असं म्हणताच उपस्थित बाधवांनी हात उंचावून त्यांना तितकाच उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे संचलन चंद्रकांत देवकते यांनी केले. यावेळी पारंपरिक वेशभूषेतील बंजारा महिलांनी औक्षण करून त्यांच पामडी व दांडपट्टा देऊन स्वागत केले. ज्येष्ठ नेते भाऊराव चव्हाण,साहेबराव चव्हाण, पप्पू चव्हाण, सुशांत पवार, बंडू राठोड, विमल जाधव आदींसह तांड्यावरील महिला भगिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

# विदर्भात काँग्रेसला खिंडार आ.राजू पारवे शिंदे गटात

**नागपूर । प्रतिनिधी**

विदर्भात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. कारण काँग्रेसचे आमदार राजू पारवे यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. तसेच राजू पारवे यांनी आमदारकीचादेखील राजीनामा दिला आहे. राजू पारवे यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश झाल्याची माहिती समोर येत आहे. स्वत: राजू पारवे यांनी 'टीव्ही ९ मराठी'ला प्रतिक्रिया देताना पक्षप्रवेश झाल्याची माहिती दिली आहे. राजू पारवे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी त्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी आज दाखल झाले. राजू पारवे हे शिवसेनेच्या तिकीटावर रामटेक लोकसभेची जागा लढवणार आहेत. राजू पारवे यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी आपली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत काम करण्याची इच्छा असल्याचं म्हटलं.

''या देशाचे लोकमान्य नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय



मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत काम करण्याची मला संधी मिळाली. सोबतच या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमचे नेते देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार या सगळ्या नेत्यांच्या नेतृत्वात मला काम करण्याची संधी मिळाली. आता मी महायुतीसोबत काम करणार आहे. मी या सर्व नेत्यांचे खूप धन्यवाद मानतो'', अशी प्रतिक्रिया राजू पारवे यांनी दिली.

# ईडी कोठडीतून केजरीवालांचे कामकाज सुरू

नवी दिल्ली । वृत्तसेवा

शंभर कोटींच्या कथित दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याचे 'सूत्रधार' दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने अटक केल्यानंतर पीएमएलए न्यायालयाने २८ मार्चपर्यंत ईडी कोठडीत रवानगी केली आहे. अरविंद केजरीवाल तुरुंगात राहून सरकार चालवतील, असे 'आप'च्या मंत्र्यांनी म्हटले आहे. यानंतर अरिंवद केजरीवाल यांनी जल मंत्रालयासंदर्भात काही निर्देश जारी केल्याची माहिती देण्यात आली आहे.

मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नाही. जेलमधूनच दिल्ली सरकारचा कार्यभार पाहणार असल्याचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आधीच जाहीर केले होते. यानंतर आपण लवकरच तुरुंगाबाहेर येऊन दिलेली आश्वासने पूर्ण करणार, असा मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पाठविलेला संदेश त्यांच्या



पत्नी सुनीता यांनी वाचून दाखविला. त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाच्या संभाव्य उत्तराधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. अरविंद केजरीवाल यांनी ईडी कोठडीतूनच कामकाज सुरू केल्याचे सांगितले जात आहे.

अरविंद केजरीवाल यांनी जल मंत्रालयाशी संबंधित काही निर्देश जारी केले आहेत. दिल्ली सरकारच्या मंत्री आतिशी यांना अरविंद केजरीवाल यांनी दिलेल्या निर्देशांबाबत नोटीस पाठवण्यात आली आहे. यासंदर्भात आतिशी माहिती देणार असल्याचे सांगितले जात आहे. तत्पूर्वी, ईडीच्या कारवाईविरोधात अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आणि तातडीची सुनावणी घेण्यासंदर्भात याचिका दाखल केली. दिल्ली उच्च न्यायालयाने केजरीवाल यांची याचिका फेटाळली.

दरम्यान, ईडीने कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही. अटकेत असतानाही चौकशी होईल, याची शाश्वती नाही. कारण ईडीला चौकशी करायची नाही. ईडीला जे करायचे ते करू शकतात. मी पूर्ण तयारी केली आहे. जनतेला मला पाठिंबा आहे, असे अरविंद केजरीवाल यांनी ठामपणे सांगितले होते.

# ताकदीने लढणार आणि गडकरी विरोधात जिंकणार : विकास ठाकरे

**नागपूर । वृत्तसेवा**

नागपूर लोकसभा मतदारसंघात कार्यकर्त्यांची मागणी होती की, मी निवडणूक लढावी आणि पक्षाने माझी उमेदवारी मान्य केली आहे. मी ताकदीने लढवणार आणि जिंकून येणार आहे असा विश्वास काँग्रेसचे उमेदवार आमदार विकास ठाकरे यांनी व्यक्त केला. शनिवारी रात्री तिकीट जाहीर झाल्यानंतर ते आज माध्यमांशी बोलत होते.

जेव्हा पक्षाने मला नागपूर शहरात कोणतेही पदे दिली नसताना जनतेची कामे केली आहेत. त्यामुळे मोठा जनाधार माझ्यासोबत आहे. लोकसभेची निवडणूक ही दोन्ही पक्षांच्या विचारधारेची निवडणूक आहे. या



देशात लोकशाही राहणार की नाही? यासाठी हा संघर्ष सुरु आहे. गेल्या काही काळात लोकशाही संपुष्टात येत आहे असे वाटत होते. या देशातील जनता लोकशाही वाचवणाऱ्या पक्षासोबत राहील हा मला विश्वास आहे. महत्वाचा मुद्दा विकास तर आहेच पण या निवडणूकीत लोकशाही संरक्षणाचा मुद्दा सर्वात महत्त्वाचा आहे.

कोणताही लोक प्रतिनिधी निवडून आल्यानंतर प्रत्येक प्रतिनिधीला वाटते की, शहराचा विकास व्हावा, एकदा जनतेने निवडून दिल्यानंतर त्या पदावर जाऊन काय काम केले यावरुन विकास करणारा व्यक्ती कोण आहे हे समजेल? असा टोलाही त्यांनी गडकरी यांचे नाव न घेता लगावला. जनतेने त्यांना दहा वर्षे निवडून दिले होते, जनतेने मला देखील या शहराचा महापौर बनवले. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार यांच्या नेतृत्वाखाली आयआरडीपीची कामे झाली, शहराचा चेहरामोहरा बदलला, मेट्रो, मिहान कागदोपत्री मार्गी लागले, अनेक विकास कामे केली होती. याकडे लक्ष वेधताना ठाकरे यांनी ही लढत जोरदार होणार असल्याचे संकेत दिले आहेत.

# सपाकडून सोळा उमेदवारांची नावे जाहीर

लखनौ : बहुजन समाजवादी पक्षाने आज (दि. २४) उत्तर प्रदेशातील लोकसभा निवडणुकीसाठी १६ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. बसपाने सात मुस्लिम उमेदवारांना तिकिट दिले आहे. यामध्ये सहारनपूर जागेवर सपा-काँग्रेस आघाडीचे इम्रान मसूद यांच्या विरोधात माजिद अली यांना उभे केले आहे. कैराना लोकसभा मतदारसंघातून श्रीपाल स्हिं यांचा सामना इक्रा हसनशी होणार आहे.

मुझफ्फरनगरमधून दारा सिंह प्रजापती, बिजनौरमधून विजेंद्र सिंह रिंगणात आहेत. सुरेंद्र पाल सिंग यांना नगीना(एससी)येथून बसपाकडून तिकिट मिळाले आहे. मोहम्मद इरफान सैफी यांना मुरादाबादमधून उमेदवारी देण्यात आली आहे.



जीशान खान रामपूरमधून निवडणूक लढवणार आहेत.

शौलत अली यांना संभल लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. बसपाने अमरोहा लोकसभा मतदारसंघातून मुजाहिद हुसैन यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचा सामना भाजपचे कंवर सिंग तवर आणि सपा-काँग्रेस आघाडीचे दानिश अली यांच्याशी होणार आहे.

# अजित पवारांनी शेतकऱ्यांना गोळ्या घातल्या -शिवतारे

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती लोकसभेला विजय शिवतारे यांनी घेतलेली बंडाची भूमिका कायम असून त्यांनी आज अजित पवार यांच्यावर जहरी टीका केली आहे. शिवतारे यांनी पुन्हा एकदा घणाघाती प्रहार करत गंभीर आरोप केले.

शरद पवारांचा माणूस असल्याच्या आरोपांवरही त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. विजय शिवतारे म्हणाले की, मी लढतोय ते जिंकण्यासाठीच. माझी लढाई पवारांविरोधात असल्याचे विजय शिवतारे यांनी म्हटले आहे. दरम्यान, विजय शिवतारे यांनी आज अजित पवार यांच्यावर अत्यंत शेलक्या शब्दांत टीका केली. शिवतारे म्हणाले की, राष्ट्रवादीकडून काही गैरसमज पसरवले जात आहेत की मला फक्त अजित पवार यांना हरवायचे आहे आणि मी शरद पवार यांचा माणूस आहे. मात्र, असा नालायकपणा मी कधीच करणार नाही.



मी जिंकण्यासाठी लढत असून माझी लढाई पवारांविरोधात असल्याचे विजय शिवतारे म्हणाले. त्यांनी सांगितले की, ही लढाई खूप मोठी आहे. सुनील तटकरे म्हणत आहेत की, शिवतारेंची स्क्रिप्ट कोण लिहून देतो ते आम्ही शोधत आहोत. ते म्हणाले की, मी तुम्हाला सांगतो, अजित पवारांनी शेतक-यांना गोळ्या घातल्या तेव्हा तुम्ही गप्प राहिला. शरद पवार यांना देखील माहीत आहे शिवाजी विजय शिवतारे कोण आहे. या रावणाचा वध करण्यासाठी बापू ठाम असल्याचे ते म्हणाले.

# लंकेंना आणलं, आता शरद पवार यांच्याकडून आणखी एक टास्क?

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक मोठ्या घडामोडी घडत आहेत. अनेक नेते आपल्या सोईनुसार पक्षबदल करताहेत. याविशाय तिकीट मिळण्याची शक्यता लक्षात घेऊनही अनेक नेते आपली भूमिका बदलताना दिसत आहेत. यामध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रावादीचे आमदार निलेश लंके यांचाही समावेश आहे. लंके यांना शरद पवार यांच्या गटात आणण्यासाठी शिरुरचे खासदार अमोल कोल्हे यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली आहे. याच अमोल कोल्हे यांनी आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीत आणखी नेते येतील असे संकेत दिले आहेत.

अमोल कोल्हे रविवारी (२४ मार्च) पुणे दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी कात्रज भागात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने होळीचे दहन केले. यावेळी त्यांनी महागाईची होळी पेटवत सत्ताधाऱ्यांवर टीका केली. होळी पेटवल्यानंतर होळी रे होळी पुरणाची पोळी, गद्दारांना देऊ निष्ठेची गोळी, अशा प्रकारच्या घोषणा देण्यात आल्या. त्यानंतर त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केले. शरद पवार यांच्याविषयी बोलल्यावरच प्रत्येकजण चर्चेत येतो. त्यामुळेच शरद पवार यांच्यावर टीका केली जात आहे. शरद पवार यांनी गेली ५५ वर्षे महाराष्ट्रातील जनतेसाठी खूप काही केले आहे. त्यामुळे शरद पवार यांच्यावर टीका केली म्हणजे, या कामात बदल होईल असे नाही. महायुतीच्या पायाखालची वाळू सरकली आहे. देशपातळीवरही असेच चित्र आहे. भाजपकडून ४०० पारचा नारा लावला जात आहे. शिवसेना फोडून ४०० पार होत नाही हे भाजपला समजले. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी फोडली. तरीदेखील ४०० पेक्षा अधिक जागा जिंकता येणार नाहीत हे समजले. त्यानंतर आता ते मनसेला सोबत घेत आहेत. तरीदेखील ४०० चा आकडा पार करता येत नाही हे दिसत असल्यामुळे आता त्यांना रासपची गरज भासत आहे, असे कोल्हे म्हणाले.

# लोकसभेचा रंग उधळण्यासाठी बजरंग सोनवणे पोटभरेंच्या शाक्य बंगल्यावर!

**माजलगाव । ज्योतीराम पांढरपोटे**

बीड लोकसभेसाठी महायुतीच्या पंकजा मुंडे यांच्या विरोधात मविआचे संभाव्य उमेदवार म्हणून बजरंग बप्पा सोनवणे यांची उमेदवारी येण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने त्यांनी जिल्ह्यातील तगड्या नेत्यांच्या भेटी घेण्यास सुरुवात केली आहे.त्यातच होळीचं निमित्त साधत बजरंगबप्पा यांनी लोकसभेचा रंग उधळण्यासाठी थेट माजलगावात बाबुराव पोटभरे यांच्या शाक्य निवासस्थानी भेट घेतली.भेटीतील चर्चा गुलदस्त्यात आहे.या भेटीमुळे महायुतीच्या गोठात मात्र अस्वस्थता पसरली आहे.

लोकसभेचा बिगुल वाजला आहे. त्यामुळे संपूर्ण देशात निवडणुकीचे वातावरण रंगताना दिसत आहे. महाराष्ट्रात पाच टप्प्यात लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत.त्यात बीड लोकसभेची निवडणूक चौथ्या टप्प्यात आहे. दरम्यान महायुतीकडून पंकजा मुंडे यांना उमेदवारी जाहीर आहे.तर बजरंगबप्पा सोनवणे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करून आपणच लोकसभेचे उमेदवार असल्याचे



## महायुतीच्या गोठात अस्वस्थता

अधोरेखित केले आहे.त्या अनुषंगाने उमेदवारांकडून डावप्रतिडाव आखले जात आहेत.बजरंगबप्पा सोनवणे यांनी जिल्ह्यात प्रबळ समजल्या जाणाऱ्या नेत्यांच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे.या नेत्यात पोटभरे यांची भूमिका निर्णायक राहणार आहे. दलित,ओबीसी लीडरशिप करणारा हा चेहरा कडवा मराठा आरक्षण समर्थक म्हणून पुढे आला आहे. त्यामुळे मराठा समाजामध्ये त्यांची क्रेझ निर्माण झाली आहे.आक्रमक आणि भावनेला हात घालणारी भाषणशैली तरुणांना भुरळ घालत आली आहे.ज्याच्या व्यासपीठा वरून ही तोफ धडाडणार त्याचा विजय सोपा होणार असं समीकरण मानलं जात आहे.त्यामुळे कदाचित बजरंगबप्पा सोनवणे यांनी

लोकसभेचा विजयी होळीचा रंग उधळण्यासाठी थेट केजवरून माजलगाव येथे बाबुराव पोटभरे यांच्या शाक्य बंगल्यावर भेट घेतली असल्याचा अंदाज आहे.ही भेट जवळपास तासभर चालली.या भेटीदरम्यान काय चर्चा झाली?या प्रश्नाचे उत्तर गुलदस्त्यात असले तरी सोनवणे यांनी पोटभरे यांची भेट शरद पवार यांच्या आदेशानुरूप घेतली असल्याची खात्रीलायक माहिती आहे.दरम्यान या भेटीची जिल्हाभरात चर्चा झाल्याने महायुतीच्या गोठात मात्र अस्वस्थता पसरत असल्याची स्थिती आहे.

# भाजपाचे शरद पवार यांना प्रत्युत्तर संविधान बदलाच्या अफवा

**मुंबई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या गॅरंटीपुढे निभाव लागत नाही, त्यामुळे आता भारताचे संविधान बदलणार अशा अफवा पसरवायला सुरूवात केली. ज्येष्ठ नेते शरद पवारही यात सहभागी झाले आहेत, ही अतिशय दुर्दैव बाब आहे असा उपरोधिक टीका भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शरद पवार यांच्या आरोपाला प्रत्युत्तर दिले.

पुढे बोलताना भाजपाचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, भारताचे संविधान बदलणे हे कुणाच्या बापालाही शक्य नाही. संविधान अत्यंत मजबूत आहे. शरद पवार ज्या काँग्रेस मध्ये एकेकाळी होते तो काँग्रेस पक्ष सत्तेत असताना घटना दुरुस्तीच्या नावाखाली संविधान कितीदा बदलविण्यात आले, याचा आकडा पवार साहेबांकडे नक्कीच असणार असा उपरोधिक टोलाही यावेळी लगावला.

भाजपाचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, उलट



मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने मागील दहा वर्षात संविधानाचा सन्मानच केला. पंतप्रधान मोदींनी संसद भवनाला संविधान सदन असं नाव दिलं. भाजपाने नेहमीच घटनात्मक मूल्य आणि राष्ट्रहितासाठी काम केलं आहे. त्यामुळे जनतेनं कुठल्याही नेत्यांच्या भुलथापांना बळी पडू नये. शरद पवार यांच्या तर अजिबातच नाही असे आवाहनही यावेळी केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# विजय शिवतारेंची हकालपट्टी करा! टीकेमुळे संतापलेल्या अजित पवार गटाची महायुतीकडे मागणी





**पुणे । प्रतिनिधी**

शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे नेते आणि अजित पवार यांचे कट्टर विरोधक विजय शिवतारे यांनी आज बारामती लोकसभा मतदार संघातून सूनेत्रा पवार यांच्याविरोधात अपक्ष निवडणूक लढणार असल्याचे अधिकृतपणे जाहीर केले. तसेच उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख देखील जाहीर केली आहे. यानंतर अजित पवार गट आक्रमक झाला असून महायुतीमधून बाहेर पडण्याचा इशारा मित्रपक्षांना दिला आहे. शिवतारे यांच्या भूमिकेमुळे महायुतीमध्ये वाद वाढण्याची चिन्हे आहेत.

अजित पवार गटाचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी त्याही पुढे जाऊन थेट महायुतीमधून बाहेर पडण्याचा निर्वाणीचा इशारा दिला आहे. उमेश पाटील यांनी म्हटले की, आमचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात विजय शिवतारे यांनी अश्लाघ्य टीका केल्यापासून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आम्ही करत आहोत. मात्र आजही त्यांनी अजित पवार यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले आहे. आता शिवतारेंची हकालपट्टी करा, एवढीच आमची मागणी आहे. जर निर्णय घेतला गेला नाही, तर आम्हालाही महायुतीमधून बाहेर पडण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा इशारा पाटील यांनी दिला.

उमेश पाटील म्हणाले, आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे म्हणणे मांडले. मात्र त्यानंतरही शिवतारे यांच्यावर कारवाई केलेली नाही. त्यामुळे महायुतीत राहावे की नाही? याचा आम्ही गंभीरपणे विचार करत आहोत. आता शिवतारे यांचे वर्तन सहन करण्यापलीकडे गेले आहे. आमच्या नेत्याबद्दल आक्षेपार्ह टीका आणखी सहन केली जाणार नाही.शिवतारे यांच्या भूमिकेमुळे राज्यभरातील शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये दुरावा वाढत चालला आहे. ज्याचा फटका सरतेशेवटी महायुतीच्या मतदानावर होईल. त्यामुळे शिंदे यांनी शिवतारे यांची तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी पाटील यांनी केली. दरम्यान, शिवतारे यांच्या भूमिकेवर प्रतिक्रिया देताना शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी शिवतारे यांना फटकारले आहे. शिरसाट म्हणाले, विजय शिवतारे यांची पक्षाने समजूत काढली आहे. मात्र तरीही ते हट्टाला पेटले असतील तर त्यांनी पक्षाचा राजीनामा द्यावा आणि खुशाल निवडणूक लढवावी. जर ते शिवसेनेतून बाहेर पडून निवडणूक लढविणार असतील तर त्यांना आम्ही थांबवू शकत नाही.

# निवडणुकीत होणाऱ्या गैरप्रकारांवर २६४ पथकांची देखरेख

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत उमेदवार आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चावर आणि निवडणुकीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी १३५ भरारी पथके आणि १२९ स्थिर सर्वेक्षण पथकांची स्थापन करण्यात आली आहे. खर्च संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अधिकारात जिल्हास्तरावर समन्वय अधिकारी नेमण्यात आले आहेत. प्रत्येक मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर खर्च पथक नेमण्यात आले आहे. या पथकाचे काम अन्य विविध पथकांच्या समन्वयाने चालते. भरारी पथक (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथक (एसएसटी), व्हिडीओ सर्वेक्षण पथक (व्हिएसटी), व्हिडीओ पाहणी पथक (व्हिव्हिटी), माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती (एमसीएमसी), जिल्हा नियंत्रण कक्ष, तक्रार संनियंत्रण कक्ष आदीदेखील खर्च पथकाला सहकार्य करतात. तसेच त्यासाठी आयकर विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचीदेखील या कामात मदत घेतली जाते.

जिल्ह्यातील चार लोकसभा मतदार संघाअंतर्गत २१ विधानसभा मतदार संघात मिळून एकूण १३५ एफएसटी पथक आणि १२९ एसएसटी पथके स्थापन करण्यात आली आहेत. भोर मतदार संघात १५ आणि इतर २० मतदार संघात प्रत्येकी ६ एफएसटी स्थापन करण्यात आली आहेत. तसेच भोर विधानसभा मतदार संघात ९ आणि उर्वरित विधानसभा मतदार संघांमध्ये प्रत्येकी ६ एसएसटी स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांद्वारे मतदारांना प्रभावित करण्यासाठीची रोकड, मद्य, तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस आळा घालणे, आचारसंहिता भंगाबाबत घटनांवर लक्ष देणे, निवडणुकीतील गैरप्रकारांची माहिती घेणे, सिव्हिजिल आणि नियंत्रण कक्षाकडे आलेल्या तक्रारींवर कार्यवाही आदी कामे करण्यात येतात.

उमेदवार, राजकीय पक्षांच्या प्रचाराच्या सर्व जाहीर सभा, रॅली यांचे व्हिडीओ चित्रीकरण व्हीएसटीच्या माध्यमातून केले जाते, त्याची पाहणी व्हिव्हिटीकडून केली जाते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ३ व्हिएसटी आणि २ व्हीव्हीटी नेमण्यात आल्या आहेत. या पथकाची निरीक्षणे खर्च पथकासाठी उपयुक्त ठरतात. एमसीएमसीद्वारे उमेदवारांच्या वृत्तपत्रे तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरात खर्चाचा अहवाल समितीकडे पाठविला जातो. या विविध माध्यमातून उमेदवारांनी दर्शविलेला निवडणूक खर्चाची पडताळणी केली जाते. खर्च दर्शविण्यात आला नसल्यास त्याबाबतची नोटीस देऊन त्याच्या निवडणूक खर्चात समाविष्ट केला जातो.

# शेअर मार्केट व्यावसायिकावर चार जणांकडून हल्ला

पुणे । प्रतिनिधी

मित्राला भेटून रिक्षाने घरी जाणाऱ्या एका शेअर मार्केट ट्रेडिंग व्यावसायिकावर चार जणांनी हल्ला केला. आरोपींनी व्यावसायिक तरुणावर चाकूने सपासप वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना वडगाव शेरी येथील त्रंबकेश्वर सोसायटी ईट क्लबशॉप समोरील सार्वजनिक रोडवर शनिवारी (दि.२३) रात्री दहाच्या सुमारास घडली.

याबाबत प्रेमदत्त प्रवीण फडके (वय-२८ रा. ब्रह्मसनसिटी, वडगाव शेरी) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन चार अनोळखी व्यक्तींवर आयपीसी ३०७, ३४१, ५०४, ५०६, ३४ सह आर्म अ‍ॅक्ट, महाराष्ट्र पोलीस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रेमदत्त फडके त्यांच्या मित्राला भेटून रिक्षातून घरी जात होते. ईट क्लबशॉप समोरील सार्वजनिक रोडवर चार जणांनी रिक्षा अडवून रिक्षा चालकाला शिवीगाळ केली. तसेच रिक्षाच्या दोन्ही साईटकडून येऊन फिर्यादी यांना हाताने दाबण्याचा प्रयत्न केला. आरोपीपैकी एकाने चाकू सारखे हत्यार बाहेर काढून फिर्यादी यांच्यावर वार केले.

तर दुसऱ्याने हातातील कड्याने फिर्यादी यांच्या डोक्यात मारहाण केली. त्याचवेळी एकाने बंदूक काढ, गोळी घाल असे ओरडत असताना फिर्यादी आरोपींना धक्का देऊन रिक्षातून बाहेर आले.जीव वाचवण्यासाठी पळून जात असताना एकाने जाकेट पकडून पोटावर वार केला. मात्र, फिर्यादी यांनी वार चुकवल्याने हातावर वार लागला.त्यानंतर दोन आरोपींनी फडके यांना बाजूला नेऊन कनावर वार करुन जखमी करुन तेथून सर्वजण पळून गेले.पुढील तपास येरवडा पोलीस करीत आहेत.

## धुलीवंदनाच्यानिमित्त मेट्रोच्या वेळेत बदल

**पुणे । प्रतिनिधी**

आज धुळवडीनिमित्त पुणे मेट्रोची प्रवासी सेवा सकाळी ६ ते दुपारी २ या वेळेत बंद ठेवण्यात येणार आहे. दुपारी २ ते रात्री १० या वेळेत मेट्रोची प्रवासी सेवा सुरू राहणार असल्याची माहिती 'महामेट्रो'कडून देण्यात आली.

आज धुलीवंदन अर्थात धुळवड आहे. या निमित्ताने पुणे आणि पिंपरी चिंचवड तसेच ग्रामीण भागात रंग खेळले जातात. मेट्रोच्या प्रवासादरम्यान रंग खेळले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्टेशन आणि मेट्रोच्या डब्यांमध्ये रंग खेळले जाऊन अस्वच्छता होऊ शकते. स्वच्छतेवर परिणाम होऊ नये म्हणून मेट्रोने सोमवारची फेऱ्यांची वेळ बदलली आहे. मेट्रोची दैनंदिन वेळ सकाळी ६ ते रात्री १० अशी असते. मात्र, धूलिवंदनानिमित्त आज दुपारी २ ते १० अशी वेळ बदलण्यात आली आहे. वेळेतील बदलाची प्रवाशांनी नोंद घ्यावी असे आवाहन मेट्रो प्रशासनाने केले आहे.

# महिलांनी राजकारणात यावे -खा.कुलकर्णी

## आगरवाल फेडरेशनतर्फे कृष्णामाई मित्तल यांना जीवनगौरव पुरस्कार

**पिंपरी । प्रतिनिधी**

कोणतेही क्षेत्र वाईट नसते, वाईट असते ती व्यक्ती . सर्व क्षेत्रात वाईटपणा तर आहेच. जर महिला राजकारणात आल्यास हे क्षेत्र चांगले होईल.असे मत खासदार प्रा मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

आगरवाल समाज फेडरेशन पुणेच्या वतीने यांना जीवनगौरव पुरस्काराने सौ कृष्णामाई प्रेमचंद मित्तल यांना सन्मानित करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय करणाऱ्या महिलांना माता माधवी अग्र गौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.



**डावीकडून गुरप्रीत कौर, राजमाला कृष्णकुमार गोयल, खा मेधा कुलकर्णी, कृष्णामाई मित्तल, प्रेमचंद मित्तल, कृष्णकुमार गोयल,के एल बंसल, विनोद बंसल आदी मान्यवर**

यावेळी अभिनेत्री ईशा आगरवाल, पंजाबी मॉडेल गुरप्रीतकौर मान,फेडरेशनचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल,उपाध्यक्ष विनोद शि.बंसल, सचिव सीए के.एल बंसल, राजमाला कृष्णकुमार गोयल,कोषाध्यक्ष श्याम बंसल महिला समिती अध्यक्षा अनिता आगरवाल मान्यवर उपस्थित होते. खासदार प्रा. कुलकर्णी पुढे म्हणाल्या कि, आजकाल दहावी - बारावी सह सर्व स्पर्धा परीक्षेत मुली आपल्या मेहनतीने अग्रेसर असतात. महिलांचे अंतर्मन सुंदर आहेत म्हणून बाह्य सौंदर्य खुलून दिसते. घरगुती असो कि कार्यालयीन कामात त्या प्रामाणिक असतात. कुटुंबासोबत वचनबद्ध असतात. महिलांना पुढे जाण्यासाठी पुरुषांनी प्रेरणा दिल्यास, त्यांना सहकार्य केल्यास महिलांच्या हातून उत्कृष्ट कार्य घडेल.

कृष्णकुमार गोयल म्हणाले कि, आगरवाल समाजात एकसे बढकर एक हिऱ्यांसारख्या व्यक्ती आहे. त्यांना समाजासमोर आणण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.आपल्या समाजात सुरुवातीपासूनच महिलांना मानाचे स्थान आहे. माता माधवी आणि माता महालक्ष्मी या आपल्या समाजासाठी प्रेरणास्त्रोत आहेत.

समाजातील प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार कृष्णा प्रेमचंद मित्तल यांना तर शतायुषी बिमला बुलचंद गोयल, तर आदर्श माता - शोभा गुप्ता, प्रकाशी बन्सल यांना प्रदान करण्यात आला.

कु निती अग्रवाल(क्रीडा), कु. याना अग्रवाल, आदर्श गृहिणी - अलका जालान, श्रीमती बिमला अग्रवाल, काल आज आणि उद्या - श्रीमती कृष्णा गोयल, गीता गोयल, पूजा गोयल, रजनी गोयल, धार्मिक क्षेत्रातील रजनी श्रीकिशन गोयल. सुनीता बन्सल, सांस्कृतिक क्षेत्रातील सुनीता गर्ग, राजकीय क्षेत्रातील शोभा सुरेश लोहिया, कायदा व सुव्यवस्था क्षेत्रातील सुनीता बन्सल, वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. चेतना अग्रवाल, शैक्षणिक क्षेत्रातील आरती गुप्ता, व्यावसायिक क्षेत्र पूनम गुप्ता, उद्योजकता क्षेत्रातील कोमल अग्रवाल, कु. भाविका गुप्ता, कु. कनक मित्तल, कु. तानिया संदीप गुप्ता, पत्रकारिता क्षेत्र, कु. नेहा बन्सल-अग्रवाल यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.आगरवाल समाज फेडरेशनचे सचिव के.एल.बंसल, उपाध्यक्ष विनोद बन्सल यांनी फेडरेशन च्या कार्याची माहिती दिली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मीना गोयल, उषा तुलश्यान, लक्ष्मी बन्सल, विकास गर्ग, दीपक विश्वकर्मा आदींनी विशेष सहकार्य केले. याशिवाय पुणे अग्रवाल समाजाच्या महिला अध्यक्षा भारती जिंदाल, गोल्डन क्लबच्या माजी अध्यक्षा सरस्वती गोयल, विद्यमान अध्यक्ष गोयल, युवा अध्यक्ष विकास गर्ग, पंकज अग्रवाल, हितेश अग्रवाल, वेदप्रकाश गुप्ता, डॉ.बालकिशन अग्रवाल पदाधिकारी उपस्थित होते.

# परवानगीशिवाय पाणी चोरी; तीन शेतकऱ्यांवर गुन्हा

टाकळी हाजी : : कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १ नारायणगाव यांच्या परवानगीशिवाय पाणी चोरी करून शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी शिरूर पोलिसांनी मलठण (ता. शिरूर) येथील तीन शेतकर्यांवर गुन्हा दाखल केला. बुधवारी ( दि. २०) रात्री अकराच्या सुमारास मलठण (शिंदेवाडी ) येथे हा प्रकार घडला. याप्रकरणी कुकडी पाटबंधारे विभागाचे अधिकारी बिनागीर भाऊसाहेब गोसावी यांनी शिरूर पोलिसांत फिर्यादी दाखल केली. त्यानुसार सुरेश पांडुरंग गायकवाडसह इतर तीन शेतकर्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला.



बुधवारी ( दि. २०) रात्री अकराच्या सुमारास मलठण (शिंदेवाडी ) येथे कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १ नारायणगाव यांच्या परवानगी शिवाय सुरेश गायकवाड व इतर तीन साथीदारांनी विमोचक ५४ चे गेट तोडून नुकसान केले. पाणी चोरून वापरून सार्वजनिक व शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. तसेच शिवीगाळ, दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलिस हवालदार उमेश भगत करत आहेत.

उन्हाची तीव्रता वाढल्याने या भागातील पिके पाण्याविना होरपळू लागली आहेत. जवळपास २६ दिवसांपासून कालव्याचे पाणी सुरू असून, मलठण गावातील शेतकर्यांना पाणी मिळत नव्हते. याबाबत वारंवार पाटबंधारे विभागाच्या अधिकार्यांना विनंती करूनही पाणी न दिल्याने शेतकरी आक्रमक झाले असून, पाण्यासाठी वाटेल तो संघर्ष करण्याची तयारी असल्याचे येथील सोसायटीचे माजी अध्यक्ष नाना फुलसुंदर यांनी सांगितले.

दरम्यान, गेल्या वर्षाची पाणीपट्टी भरली असतानाही आमच्यावर अन्याय का ? असा प्रश्न येथील शेतकरी विचारत आहेत. कालव्याला पाणी सुरू असतानाही आपली पिके जळत आहेत हे पाहून पाणी उशाला आणि कोरड घशाला अशीच परिस्थिती या ठिकाणी निर्माण झाली आहे. शेतकर्यांवर गुन्हे दाखल झाल्याचे समजताच इतर शेतकरी आक्रमक झाले असून, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी शेतकरीवर्गातून होत आहे.

# चक्क रस्ता गेला चोरीला..! सरपंच, उपसरपंचासह ग्रामपंचायत सदस्यांवर आरोप

**भोर । प्रतिनिधी**

गवडी (ता. भोर) गावापर्यंतच्या रस्त्याचे काम न करता परस्पर १३ लाख ३३ हजार ५७ रुपयांचा निधी काढून घेतल्याने हा रस्ता चोरीला गेला आहे. सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. या संदर्भातील निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे, अशी माहिती माजी सरपंच एकनाथ शिळीमकर यांनी दिली.



पत्रकार परिषदेत ते बोलत होते. निखिल राजेशिर्के, बाप्पा साळुंके, चंद्रकांत कुमकर, दिलीप साळुंके, सुदाम साळुंके यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

एकनाथ शिळीमकर म्हणाले, गवडी ते प्रजिमा १४२ मार्ग सा. क्र. ० ते १ (ग्रा.मा. ४४) या रस्त्याच्या कामाची निविदा शासनाने काढली. या कामासाठी १३ लाख ३३ हजार ५७ रुपयांचा निधी मंजूर होता. या कामासाठी ठेकेदार म्हणून ग्रामपंचायत गवडीचे विद्यमान सरपंच, उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य हे होते. परंतु सद्यपरिस्थिती या रस्त्याचे कामच झाले नाही. सर्वांनी बांधकाम विभागाशी संगनमत करून रस्त्याचे काम न करता सगळा निधी हडप केला. त्यानंतर हा भष्ट्राचार लपविण्यासाठी सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी राजीनामा देण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. दरम्यान, बांधकाम विभागाकडून या कामाची पाहणी करून १५ दिवस झाले तरी अद्यापि अहवाल देण्यात आलेला नाही. प्रशासन कारवाई करण्यास टाळटाळ करीत असल्याचा आरोपही ग्रामस्थ करीत आहेत, असे निवेदनात नमूद केल्याचे शिळीमकर यांनी सांगितले.

# बिबट्याच्या हल्ल्यात २ जनावरे ठार, वासरू जखमी

वेल्हे : : रायगड जिल्ह्यालगतच्या पानशेत धरणखोर्यातील खाणू (ता. वेल्हे) येथे ३ बिबट्यांनी एकाच वेळी जनावरांच्या कळपावर हल्ला केला. या हल्ल्यात एक गाय, एक वासरू जागीच ठार झाले, तर दुसरे वासरू गंभीर जखमी झाले. हा प्रकार गुरुवारी (दि. २१) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास रानात घडला. सखाराम जिजाबा भोड हे रानातून जनावरे घेऊन घरी चालले होते. त्या वेळी पाऊलवाटेवरील झुडपात धबा धरून बसलेल्या ३ बिबट्यांनी एकाच वेळी जनावरांच्या कळपावर हल्ला केला. बिबट्यांना पाहून सखाराम जनावरांना सोडून धावत घरी आले. खाणू गावात दोन-तीन कुटुंबेच राहत आहेत. बिबट्यांच्या दहशतीमुळे सखाराम भोड हे रात्री रानात गेले नाही. काही जनावरे रात्री घरी आली; मात्र एक गाय व दोन वासरे आली नाहीत. शुक्रवारी (दि. २२) सकाळी सखाराम रानात गेले असता बिबट्याच्या हल्ल्यात गाय व वासरू जागीच ठार झाल्याचे दिसले, तर एक वासरू गंभीर जखमी अवस्थेत झुडपात पडलेले दिसले.



पानशेत खोर्यातील जंगलात वणव्यांमुळे तसेच अन्न-पाण्याच्या तुटवड्यामुळे वन्यप्राणी नागरी वस्त्यांत धाव घेत आहेत. उन्हाळा सुरू झाल्यापासून गेल्या दीड महिन्यात या भागात बिबट्यांनी १५ हून अधिक जनावरांचा फडशा पाडला आहे.

गंभीर जखमी वासरूही दगावण्याची शक्यता आहे. या भागात एका मादीसह ४ बिबट्यांचा वावर आहे. त्यामुळे शेतकर्यांना रानावनात जाणे धोक्याचे झाल्याचे टेकपोळेचे माजी सरपंच दिनकर बामगुडे यांनी सांगितले.

# चेन्नई-दौंड दरम्यान रेल्वे गाडीमध्ये ८ लाखांच्या ऐवजावर चोरट्याचा डल्ला !

दौंड: : चेन्नई - मुंबई एक्सप्रेस रेल्वे गाडीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशाचा १५ तोळे सोने व एक किलो चांदी चा ऐवज चेन्नई ते दौंड या दरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेला असल्याची तक्रार राहुल शेषराव (वय २६ वर्ष रा. सुब्रमाने, कोयल स्टेट जवळ प्रार्थना गॅस एजन्सी कांजीपुरम)यांनी आँनलाईन नोंदवली आहे. बुधवारी (दि.२०)रोजी हा प्रकार घडला. शेषराव हे चेन्नई-मुंबई या गाडीने बोगी नंबर एम ७ ने प्रवास करत होते प्रवासा दरम्यान त्यांच्याजवळ दोन बॅगा होत्या त्यापैकी एका बँगेत हा आठ लाख दहा हजाराचा ऐवज होता.

सकाळी सहाच्या सुमारास ही गाडी दौंड रेल्वे स्थानकात येण्यापूर्वी त्यांच्या लक्षात आले की आपल्याजवळ असलेली बॅग अज्ञात चोरट्याने चोरून नेली तेव्हा त्यांनी तात्काळ गाडीमध्ये असलेल्या तिकीट तपासणीसास हा प्रकार सांगितला, त्यांनी तात्काळ ऑनलाईन तक्रार नोंदवली रेल्वेच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने या घटनेची माहिती दौंड रेल्वे पोलिसांना दिली यावरून दौंड रेल्वे पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास पोलीस नाईक पानसरे हे करत आहेत. हा गुन्हा ऑनलाईन दाखल केल्याने पुणे येथून दौंड रेल्वे पोलिसांकडे वर्ग झाला आहे. दौंड रेल्वे हद्दीमध्ये सध्या चोरटे धुमाकूळ घालत असून पोलिसांना ते सापडत नाहीत. दौंड रेल्वे स्थानकावर अनेक गुन्हे घडत असतात परंतु अनेक प्रवासी प्रवास करायचा असल्याने तक्रार द्यायच्या भानगडीत पडत नाहीत त्यामुळे रेल्वे पोलीस व आर पी एफ यांनी गस्त वाढवावी

# हल्ला झालेल्या 'त्या' युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

**बारामती । प्रतिनिधी**

चायनीज हॉटेलात पार्सल आणण्यासाठी गेलेल्या युवकावर जुन्या भांडणाच्या कारणावरून लाठ्याकाठ्या, लोखंडी रॉडने हल्ला करण्यात आला होता. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या अनिकेत शंकर धोत्रे या युवकाचा आज रविवारी (दि. २४) पहाटे उपचारादरम्यान मृत्यू झाला.

अमोल उर्फ भोऱ्या धोंडीराम पवार, हनुमंत दिलीप धोत्रे, नवनाथ महादेव धोत्रे (रा. कोअर हाऊस, आमराई, बारामती), विनोद रोहिदास धोत्रे, सुमित उर्फ भैय्या विलास धोत्रे (रा. रमाईमाता भवन, आमराई) व सागर पवार (रा. मुंबई) यांच्यावर अनिकेतवर हल्ला केल्याप्रकरणी यापूर्वीच शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात आता खूनाचा गुन्हा दाखल केला जाणार आहे.

या विषयी अधिक माहिती अशी की, दि. १७ मार्च रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली होती. अनिकेत व त्याचा मित्र रितेश मोहन देवकर (रा. चंद्रमणीनगर, बारामती) हे दोघे चायनीज आणण्यासाठी बालक मंदिराच्या पाठीमागील श्री. चायनीज हॉटेलात गेले होते. यावेळी पाच ते सहा अनोळखी युवकांनी तेथे येत अनिकेतला मारहाण केली. हॉटेलातील सीसीटीव्ही फूटेज पाहिले असता त्यात हे युवक लाकडी दांडके, लोखंडी रॉडने अनिकेतला मारहाण करताना दिसून आले आहेत. मारहाणीमुळे अनिकेत हा बाहेर पळाला असता त्यांनी त्याला गाठत पुन्हा मारहाण केली. रितेश हा भांडणे सोडवताना दिसून आला. बेशुद्धावस्थेतील अनिकेतला बारामतीतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु गंभीर मारहाण झालेल्या अनिकेतचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.